# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५५**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना ● १९३५ ● ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ४ / मार्च २००२

## संपादकीय


गोध्रा येथील हत्याकांड, त्या पाठोपाठ जाहीर झालेला अर्थसंकल्प आणि गतवर्षीच्या भूकंपातून सावरता सावरता जातीय दंगलींनी होरपळलेला गुजरात या विषयांनी माध्यमांना पूर्ण व्यापून टाकले आहे. गोध्रा येथील हत्याकांड आणि जातीय दंगलीचा वणवा या प्रकारांचा कोणताही सुशिक्षित, संवेदना जिवंत असणारा किंवा विचार करण्याच्या किमान शक्यता असलेला माणूस निषेध करेल, पण त्याबरोबरच आपणही माणूस आहोत आणि सर्व धर्मांपेक्षा मोठ्या असणाऱ्या माणुसकीच्या धर्माला कालिमा माणसांनीच लावलाय याबद्दल तो शरमिंदा ही होईल !

अर्थ संकल्पावर बरंच बोललं गेलं, लिहिलं गेलं. तज्ज्ञ अभ्यासकांपासून ते सामान्य माणसांपर्यंतच्या प्रतिक्रिया वाचायला, ऐकायला मिळाल्या. सर्वसामान्य माणसाला ही 'आकड्यांची आतषबाजी' कळत नाही, हे फार मोठं सत्य आहे. दूरदर्शनच्या एक वाहिनीवरील बातम्यांमध्ये झोपडपट्टीत राहणारांच्या प्रतिक्रिया दाखवल्या गेल्या. त्यातील एक बाई म्हणाली, ''काय तुमचं ते फेब्रुवारीमधलं बजेटचं नाटक असंल ते असलं, पण आम्हांला ऐकच कळतंय, तेल महागाई वाढणार ! '' कोणत्याही वर्षाच्या अर्थ संकल्पानंतर जनमानसाची ही भावना असते. अर्थतज्ज्ञ द. रा. पेंडसे यांचे भाकित मात्र खरे होण्याच्याच शक्यता वाटतात. ठाण्यात बोलताना ते म्हणाले, ''बँकांचे व्याजदर कमी झाल्याने बचत घटणार'' एकीकडे पैसा नाही असे म्हणत गाड्या उडवीत फिरणारे 'सरकार' आणि दुसरीकडे पगार वेळेवर होत नाहीत, बचत करणं परवडत नाही, असा भरडला जाणारा मध्यमवर्गीय नोकरदार वर्ग. त्यातून स्वेच्छा निवृत्तांचा व स्वेच्छा निवृत्तीचा प्रश्न हा ही विषय आहे....

या पार्श्वभूमीवर पेट्रोल डिझेल स्वस्त झाल्याचं वृत्त महत्त्वाचं आहे. या संदर्भात सामान्य माणसाला पहिला प्रश्न, ''आता पेट्रोल स्वस्त झालं ना, मग बसचं तिकीट रिक्षाचं भाडं कमी करायला काय हरकत आहे ?'' हा प्रश्न तर समजण्यासारखा आहे.

गेल्या महिना दीड महिन्यातील या वृत्त बावटळीतील जाणवलेली एक गोष्ट म्हणजे माध्यमे बऱ्याचदा दिशाभूलच करीत आहेत. 'माध्यमांची विश्वासार्हता' हा एक प्रश्नच आहे. एका प्रथितयश वृत्तपत्रात तर गुजरात मधील दंगलीत हातात पेटता पलिता घेऊन आक्रोश करणारा तरुण असणारं चित्र पहिल्या पानावर रंगीत स्वरुपात होतं. आपण देत असलेली बातमी 'सेन्सशनल' करण्यासाठी ती रक्तरंजनाला प्रेरणा देणारी तर ठरत नाही ना, यांच ही भान मिडीयाला नसावं ? ज्यांना नेतृत्व दिलं आहे त्यांच्या दोन विधानात संगती असत नाही. त्यामुळे खरं काय, खोटं काय असा भोवरा सामान्य माणूस अनुभवतोय.

माध्यमांनी, त्यात ज्याचे प्रतिबिंब उमटते त्या समाजाने सामाजिक, राजकीय नेतृत्व करणारांनी आत्मपरीक्षण करीत राहयला हवं ही आजची गरज आहे.



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ४ / मार्च २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ११
५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात भरलेल्या ग्रंथप्रदर्शनाचा वृत्तांत | सौ. वनिता नामदेव कदम | ३ |
| २) | पदभ्रमण | भालचंद्र रा. गोखले | ७ |
| ३) | सुसंवादाय नमः | सुरेश देशपांडे | ८ |
| ४) | आरोग्याचे शिल्पकार ! | सौ. अपर्णा काजरेकर | १० |
| ५) | इंधन वाचविण्यासाठी : भाग ३ | श्री. वि. ना. कोपरकर | १३ |
| ६) | ललित साहित्य : बदलते संदर्भ | सविता प्रभुणे | १८ |
| ७) | स्वायत्तता - घटक राज्यांची | कु. केतकी सु. लोणकर | २१ |
| ८) | प्रदूषणाच्या विळख्यात मानवी आरोग्य | श्री. प्रभाकर अरदकर | २४ |
| ९) | पक्ष्यांचा अभ्यास काही विचार | सौ. स्वाती जोशी | २६ |
| १०) | समिधा - एक वाचनीय आत्मकथन | प्रा. मोहन पाठक | २८ |
| ११) | तंत्रनिकेतनातील एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ - शब्दकोश | सा. ना. वोरसे | ३० |
| १२) | परिसर वार्ता | प्र. ग.वैद्य, माधवी राणे<br>प्रा. मोहन पाठक | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात भरलेल्या ग्रंथप्रदर्शनाचा वृतांत

*पर्वता इतकी उत्तुंग कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रांतील मोठ्या, आदर्श माणसांची चरित्रे ही प्रेरणा देणारी संपत्ती असते. आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय पर्वत वर्षाचे औचित्य साधून भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाचा हा वृतांत - संपादक*

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या केंद्रातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथप्रदर्शनाचे दिनांक २४ व २५ जानेवारी २००२ रोजी आयोजन केले होते.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे घोषवाक्य " ज्ञान गंगा घरोघरी" हे आहे. नोकरी करता करता शिक्षण घेणारे विद्यार्थी या विद्यापीठाचा लाभ घेतात. ग्रंथ प्रदर्शना बाबत आम्ही विद्यार्थी नवखे असल्यामुळे ग्रंथ प्रदर्शनाचा विषय ठरविण्यापासून ते ग्रंथमांडणी पर्यंत सर्व मार्गदर्शन केंद्र संचालक प्रा. मोहन पाठक यांनी केले. नोकरी न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाची जबाबदारी स्वीकारली. वेगवेगळ्या समित्या बनवून कामाची विभागणी केली. संयोजन समिती, निमंत्रण समिती या सर्वांच्या सहकार्याने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

पाठक सरांनी प्रदर्शनाचा विषय सुचविला आणि त्याचे उत्कृष्ट असे शब्दांकन करून दिले ते असे होते, "२००२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पर्वत वर्ष म्हणून जगभर साजरे केले जाणार आहे. मानवी इतिहासात या पर्वताइतकीच उत्तुंग कामगिरी करून इतिहासावर आपला ठसा उमटविणाऱ्या असंख्य व्यक्ती होऊन गेल्या" त्यांच्या चरित्रांचे व आत्मचरित्रांचे प्रदर्शन ग्रंथालयात भरविले होते.

२४ जानेवारी २००२ ला सकाळी ९ वाजता बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य. सी जी. पाटील यांच्या हस्ते उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत ह्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. उद्घाटन नंतर ग्रंथालयात प्रवेश केल्यानंतर तेथील वातावरण शांत व प्रसन्न वाटले. प्रथमदर्शनी संत ज्ञानेश्वराची व गणेशाची प्रतिमा दृष्टीस पडली. रंगीबेरंगी पताक्यांनी ग्रंथालय सजविले होते. ग्रंथालयामध्ये मधोमध सुंदर, सुबक व बहुरंगी रांगोळी रेखाटली होती. अगरबत्तीचा सुगंध दरवळत होता आणि साथीला संगीताची मधुर धून लावली होती. अशा सुंदर वातावरणात ग्रंथ प्रदर्शन बघणे म्हणजे ग्रंथप्रेमींना एक पर्वणीच होती.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध असलेली चरित्रे व आत्मचरित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. हे विज्ञान महाविद्यालय असल्यामुळे तेथे विज्ञानावरील पुस्तके मुबलक प्रमाणात आहेत. परंतु साहित्यातील उत्कृष्ट कथा व कादंबऱ्याही या ग्रंथालयात आहेत. या प्रदर्शनात जगत् विख्यात शास्त्रज्ञ, चित्रपटक्षेत्रातील व्यक्ती, लेखक, उद्योगपती, सामाजिक क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या व्यक्ती, अध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्ती, यांची चरित्रे व आत्मचरित्रे ठेवली होती. यातील काही पुस्तके महत्त्वाची होती. त्यातील काही नावे खालील प्रमाणे:

Jamanalal Bajaj / Gandhiji's Fifth son
Shriman Narayan
उंटावरचा प्रवास / दि. प. दांडेकर
The Searching spirit/Joy Adomson
महिलांच्या आत्मचरित्रे व चरित्रांमध्ये
स्मृतिचित्रे - लक्ष्मीबाई टिळक
बंध-अनुबंध - कमल पाध्ये

स्नेहांकिता - स्नेहप्रभा प्रधान
उषःकाल - उषाकिरण

वीणा गवाणकरांचे - आयडा स्कडर, सालीम अली, एक होता कार्व्हर अशी विविध प्रकारची चरित्रे या प्रदर्शनात होती. ग्रंथ प्रदर्शनाचा सर्वात महत्त्वाचा भाग असतो तो म्हणजे वाचकांचा अभिप्राय. अशा अभिप्रायां मधून आपल्याला प्रदर्शनाला भेट दिलेल्या वाचकांची नक्की संख्या सांगता येते तसेच त्याच्या मनातील विचारांना वाव देता येतो. काही अभिप्राय खाली नमूद केले आहेत.

**श्री. श्री. वि. करंदीकर**, उपाध्यक्ष, वि. प्र. मंडळ, ठाणे.

विज्ञान महाविद्यालयाने अशा रीतीने चरित्र आत्मचरित्रांचे सुंदर असे बऱ्याच पुस्तकांचे प्रदर्शन प्रशंसनीय मांडले आहे. पुस्तके बघून 'वाचाल तर वाचाल' या म्हणीची आठवण होते. हार्दिक शुभेच्छा !

**डॉ. विजय बेडेकर**, कार्याध्यक्ष, वि. प्र. मंडळ, ठाणे.

चांगले चारित्र्य घडण्याकरता या चरित्र ग्रंथांचे वाचन प्रेरणादायी ठरेल. एक स्तुत्य उपक्रम.

**श्री. उत्तम जोशी** (कार्यवाह),**श्री. मा. य. गोखले** (कोषाध्यक्ष), वि. प्र. मंडळ, ठाणे.

अत्यंत स्तुत्य उपक्रम. हे प्रदर्शन पाहून तरी मुलांनी पुस्तके-चरित्रे वाचनास प्रारंभ करावा.

**प्राचार्य सी. जी. पाटील**

"उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तींची पुस्तके पाहून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. प्रदर्शनाचे आयोजन देखणे आहे."

**उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर**

"पर्वता एवढ्या उत्तुंग व्यक्तीमत्त्वांना पर्वत वर्षात विद्यार्थ्यांसमोर आणणे ही कल्पनाच कौतुकास्पद आहे. या व्यक्तीमत्त्वांकडून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाचे सार्थक करावे, आयोजन खूपच सुंदर !"

**श्री. ना. ह. मराठे**, निवृत्त सरकारी अधिकारी

"ग्रंथ प्रदर्शन चिकित्सक तऱ्हेने पाहिले. त्यातील विज्ञान नाटक, सिनेमा यातील अधिकारी व्यक्तींची पुस्तके चाळून पाहिली. बहुतांश इंग्रजी पुस्तके आहेत. परंतु अध्यात्मिक पुस्तकेही आहेत. त्यातील श्री. माधव नाथ (माझे सहाध्यायी) यांचे डॉ. सुषमा बाटवे यांचे पुस्तक मला भावले. कारण जीवनाच्या अंतिम चरणी अशाच पुस्तकांचा आधार असतो. मी गुरुबद्दल साशंक होतो. पण हे पुस्तक चाळल्यानंतर मला जीवनात गुरुंच्या मार्ग दर्शनाचा आधार वाटला.

**श्री. विश्वनाथ शेंड्ये** - ग्रंथपाल, प्राच्यविद्या अभ्यास केंद्र , शाहू मार्केट, ठाणे.

"चरित्र ग्रंथांचे प्रदर्शन हा एक चांगला विषय निवडलेला आहे. 'पूर्व-दिव्य' ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ या प्रमाणे पूर्वसुरींची कर्तबगारी ही पुढील पिढ्यांना स्फूर्ती आणि प्रेरणादायक असते. म्हणून या विषयाची निवड व विद्यार्थ्यांना ओळख करून देण्याचा प्रयत्न स्तुत्य."

**गोविंद साठे** - इ/१ पूर्वा सोसायटी, पाचपखाडी, ठाणे .

"अत्यंत साधेपणाने, पण उचित अशी वातावरण निर्मिती, मनोवेधक रांगोळी, ग्रंथ इतके मोजके अणू पदार्थ (पक्वान्न) पाहून भूक चाळवावी पण खायला मिळू नयेत असे कल्पक आयोजन आणि विद्यार्थ्यांनी बरेच काही वाचून शिकावे अशी एकूणच ग्रंथसंपदा, ग्रंथाची शीर्षके पाहूनच ते आत्ताच वाचण्यास बसावे ही उद्भवणारी इच्छा. वर्णन करावे तितके थोडे, प्रा. पाठकांची पूरक माहिती. सर्वच कौतुकास्पद ! वाचायला वेळ मिळत नाही ही लटकी सबब पूर्ण लंगडी ठरावी असे हे ग्रंथ !"

**प्र. प्र. देशमुख,** सुकूर पार्क , कळवा.

" प्रदर्शन महाविद्यालयीन मुलांसाठी असताना मी एक पालक मुद्दाम हे पाहण्यास आलो. आणि ही सर्व पुस्तके पाहून भारावून गेलो. असे प्रदर्शन खरोखरच आवश्यक आहे कारण बऱ्याच वेळा विद्यार्थ्यांस अशी पुस्तके पाहण्यास वेळ नसतो पण प्रदर्शनात ही पुस्तके पाहून वाचण्याची आवड निर्माण होईल यात शंकाच नाही.

**रेखा श्रीकांत चऱ्हाटे,** ग्रंथपाल, कीर्ती कॉलेज, दादर

" चांगला विषय, उत्तम निवड, विशेषतः विषय सुचणे महत्त्वाचे. सर्वांना उपयोगी असे प्रदर्शन आहेच. तसेच रांगोळी वगैरे घालून उत्तम संस्कृतीचे देखील प्रतीक वाटले."

**प्रा. महेश दळवी** - ग्रंथपाल - ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

"ग्रंथप्रदर्शनासाठी प्रा. मोहन पाठक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत खरंच दाद देण्यासारखी आहे. या मुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तींच्या चरित्रांशी ओळख झाली."

**श्री. समीर गाडवे,** एक विद्यार्थी

"आयुष्याचे निरनिराळे रंग पहायला मिळाले. प्रत्येकाने यातील काही छटा अनुभवल्या तरी प्रदर्शनाचे सार्थक होईल."

**कु. सुशील सोपान साळवी**

" उत्तुंग विचारांच्या, चरित्र्याच्या व पर्वताप्रमाणे कार्य करून त्याचा ठसा जनमानसात उमटविणाऱ्या थोर पुरुषांच्या जीवनाच्या कार्याची ओळख करून देणाऱ्या या ग्रंथप्रदर्शनाला व त्यांच्या आयोजकांना मनापासून अभिनंदन व धन्यवाद !"

**प्रा. उषा तांबे,** बांदोडकर कॉलेज

"खूप वेगवेगळ्या क्षेत्रातील चरित्रे पहायला मिळाली. किती वाचायची राहिली आहेत याची मनात नोंद ही झाली. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहून आनंद वाटला."

**श्री. चंद्रकांत सु. शिंगाडे,** वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.

"चरित्र किंवा आत्मचरित्र हे एखादाच्या जीवनाचा मूर्तीमंत आलेखच. अशा चरित्रातून किंवा आत्मचरित्रातून अनेकांना स्फूर्ती मिळते. म्हणून आत्मचरित्रे किंवा चरित्रे फार महत्त्वाची असतात. म्हणूनच अशा प्रदर्शनाचे आयोजन महत्त्वाचे वाटते"

**विद्यार्थी** (T.Y. B.A.) Economics

"दुर्मिळ पुस्तके पहावयास मिळाली सायन्स ग्रंथालयात देखील चांगली पुस्तके जोपासलेली पाहून सुखद धक्का बसला ."

**श्री. खोज्वेकर विष्णु** (S.Y. B.com.)

" सध्याच्या धकधकीच्या जीवनामध्ये एकंदर मुलांना आणि सगळ्यानाच साहित्याकडे लक्ष देणे कठीण झाले आहे. आणि काही वेळा वेळही नसतो. त्यातच महाराष्ट्र सरकारने मराठीच्या भवितव्यावर आणलेली गदा, यामुळे हे प्रदर्शन हे एक मोठे पाऊल असे मला वाटते."

**श्री. मधुसुदन लक्ष्मण दाते**

" प्रदर्शन चांगले आहे. एक सूचना येथे ग्रंथालयात झेरॉक्स करण्याची सोय असावी म्हणजे ग्रंथाचा काही भाग झेरॉक्स करता येईल ."

जसे पसंतीचे अभिप्राय मिळाले तसेच काही सूचना व त्रुटी दर्शविणारे अभिप्राय देखिल आहेत. अशा अभिप्रायांमुळे चुकांची पुनरावृत्ती टाळता येते.

या चरित्र व आत्मचरित्राच्या प्रदर्शनाला पाचशेच्या वर वाचकांनी भेट दिली. अशा प्रकारचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यामागे अनेक प्रकारचे हेतू असतात. परंतु त्यातील मूळ हेतू म्हणजे कोणत्याही संस्थेला आपल्या कार्याची ओळख करून देताना प्रसिध्दी ही करावी लागतेच. अशी वेगवेगळ्या प्रकारची प्रदर्शने ही ग्रंथालय-प्रसिध्दीची प्रभावी साधने आहेत. ग्रंथालयात असलेल्या बऱ्याच ग्रंथांची माहिती विद्यार्थ्यांना नसते. वर्षातून एकदा विषय निवडून ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले तर ग्रंथालयातील वाचन साहित्याची ओळख होते ग्रंथप्रदर्शनामुळे वाचक या पुस्तकाच्या प्रत्यक्ष संपर्कात येतो त्याला ग्रंथालयातील पुस्तके हाताळायला मिळतात. पुस्तकाची प्रस्तावना व आतील मजकूर वाचता येतो. एकंदरित पुस्तकांबद्दलची संपूर्ण माहिती वाचकाला थोड्याच वेळात होते. महाविद्यालयातील ग्रंथालय हे शैक्षणिक ग्रंथालय असल्यामुळे ह्या ग्रंथालयातील वाचक म्हणून विद्यार्थी व शिक्षकांचा समावेश होतो. या सर्वांना संस्थेच्या ग्रंथालयातील साहित्य संपदेची माहिती त्यांना होते व हवी असलेल्या पुस्तकांची मागणी करून त्यांचा लाभ घेऊ शकतो. विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयात चरित्र व आत्मचरित्रे यांचा संग्रह दुर्मिळ असला तरीही काही पुस्तके आणखी असावयास हवी ती अशी.

१) अब्दुल कलाम - अग्नीपंख २) चार्ली चॅप्लीन - हसरे दुःख ३) पांडुरंगशास्त्री आठवले - देह झाला चंदनाचा तसेच लाल बहादूर शास्त्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शि. रा. रंगनाथन यांच्या आत्मचरित्रांचा समावेश असावा.

आम्ही सर्व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी असल्यामुळे एक खंत मनात राहून गेली आणि ती म्हणजे राजकीय क्षेत्रात कार्य करणारे कै. यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राचा समावेश या प्रदर्शनात करू शकलो नाही.

पुस्तकांच्या वाढत जाणाऱ्या किंमतीमुळे सामान्य माणसाला पुस्तक खरेदी करून वाचणे परवडण्यासारखे नाही. अशावेळी वाचक हा आपली वाचनाची भूक अशा ग्रंथप्रदर्शनातून भागविताना दिसतो. एकविसाव्या शतकात पुस्तकाचे बदलत जाणारे स्वरूप म्हणजे काही पुस्तके ही सी. डी. वर ((Compact Disc) उपलब्ध होऊ लागली आहेत. ज्ञानोपार्जनासाठी ह्या गोष्टी योग्य वाटतात. परंतु माणूस हा पुस्तकाच्या आतील मुद्रीत लिपी तसेच ते पुस्तक हातात घेतल्यावर त्याचा जाणवणारा स्पर्श ह्या सर्व गोष्टींशी भावनिक पणे गुंतलेले आहे. अशा वाचकाला सी. डी वरील पुस्तक वाचण्याचे समाधान मिळू शकेल का ?

मनुष्य जीवनात ग्रंथ हे विविध प्रकारे मार्गदर्शन करत असतात. त्याच्या चढत्या व उतरत्या काळात पुस्तकेच त्याला साथ सोबत करताना दिसतात. एखादा चांगला ग्रंथ वाचनात आला तर माणसाचा जीवनपट बदलून टाकतो. माणूस हा स्वानुभवानेच शहाणा होत असला तरी महान व्यक्तींची चरित्रे आणि आत्मचरित्रातून त्याला बरेच काही शिकण्यासारखे असते. या व्यक्तींच्या जीवनात आलेल्या संकटांना त्यांनी धैर्याने व जिद्दीने सामोरे जाऊन आपल्या जीवनाचे सार्थक कसे केले याची अनुभूती आपल्याला येते.

म्हणूनच कविवर्य 'मंगेश पाडगावकरांच्या' कवितेच्या काही ओळी मी खाली नमूद करते.

> '' वाचन आहे प्रवास सुंदर, नव्या नव्या ज्ञानाचा
> इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा !
> नव्या युगाचे नव्या जगाचे प्रकाश गाणे गाती
> ग्रंथ आमुचे साथी ग्रंथ आमुच्या हाती
> ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती.''

सौ. वनिता नामदेव कदम
य. च. म. मु. वि (ग्रंथालय व माहितीशास्त्र)
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय केंद्र, ठाणे.

•••

## पदभ्रमण

आपल्याला पदभ्रमणाचीआवड आहे का ? नसल्यास त्याची आवड जोपासा. पदभ्रमणाचे अनेक फायदे आहेत. उदा.

१) पदभ्रमणात आपण निसर्गाच्या जवळ जातो. प्रदूषण नसलेल्या मोकळ्या हवेत फिरण्याचा आनंद मिळतो.

२) पदभ्रमणामुळे आपोआप व्यायाम होतो. भरपूर चालल्याने अनावश्यक चरबीचा निचरा होतो.

३) पदभ्रमणात इतर सहप्रवाशांबरोबर विनोद, गप्पा, नवीन ओळखी यामुळे मानसिक ताणाव दूर होण्यास मदत होते.

४) पदभ्रमणामुळे शिस्त लागते. चार चौघात कसं वागावं याचे आपोआपच ज्ञान मिळते. चांगली सणसणून भूक लागते. खिचडी, पोहे, चहा जे समोर असेल ते निमूटपणे खायची सवय लागते.

५) पदभ्रमण म्हणजे समाजकार्य, जनसंपर्क, संभाषण, बंधुभाव, इ. पदभ्रमणात सहनशीलता वाढीस लागते. पडक्या देवळात सतरंजी टाकून झोपताना, आंघोळ न करता दोन तीन दिवस ट्रेनिंग करताना व्यक्तीमत्वाचा विकास आपोआप घडत जातो.

६) पदभ्रमण म्हणजे साहस, चिकाटी, धैर्य. जंगल पार करणे, डोंगर चढणे, रस्ता चुकणे, काड्यापेटी विसरणे इ. बऱ्याच गमती जमती घडतात.

७) पदभ्रमण म्हणजे वेळेच नियोजन, हिशोब ठेवणे, प्रथमोपचाराची माहिती, फोटोग्राफी करणे तसेच वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्तींना एकत्र आणणे.

८) आणि शेवटी पदभ्रमण म्हणजे सहकार्य, व्यापक दृष्टी, राष्ट्रप्रेम, संस्कृतीप्रेम, तीर्थयात्रा, विश्वव्यापकता, समजुतदारपणा.

तेव्हा मंडळी, पदभ्रमणाला सुरुवात करा. आपल्या महाराष्ट्रात अनेक किल्ले, गुहा इ. ठिकाणे अशी आहेत जेथे दोन-तीन दिवस मजेत घालवता येतील. चिंतन, आकाश दर्शन, झाडपाण्याची माहिती, शिवाय मुंबईच्या धावपळीच्या जीवनातून दूर इ. अगणित फायदेच फायदे.

भालचंद्र रा. गोखले
वेडेकर सदन, मोगल लेन,
माहीम -मुंबई.



# सुसंवादाय नम:

*जीवनात सुख मिळवायचे असेल तर सहवासातील माणसांशी सुसंवाद साधणे जमायला हवे. या सुसंवादाबद्दल चे हे तत्व चिंतन - संपादक*

कुठलीही गोष्ट तुम्ही जर शांतपणाने ऐकून घेतलीत आणि त्या व्यक्तीशी संवाद साधलात तर वाद संपून तुमच्या पदरात फलप्राप्ती होऊन तुम्हाला एक प्रकारचे मानसिक समाधान मिळेल. पण तोच वाद जर चिघळला तर त्याचे पर्यवसन कुठल्याही प्रसंगात किंवहुना अतिप्रसंगात होऊ शकते. त्यामुळे तुमची मानसिक शांतता, मानसिक अस्वस्थता, बेचैनी, अस्थिरता, भय, चिंता, राग, क्षोम, ताणतणाव, मानापमानाचे प्रसंग, या सर्व गोष्टींमुळे नुसत्या मनाची नाही तर शारीरिक अस्थिरता सुध्दा आपण अनुभवतो. अशा वेळी शरीराची हालचाल सतत होत राहते.कोणतेही काम नीटपणे होत नाही. हातातून वस्तू खाली पडतात, श्वसन जलद होते. ही सर्व लक्षणे मानसिक व शारीरिक अस्थिरतेची आहेत. आता या अवस्थेमागचे खरे कारण आपल्याला माहिती असते. परंतु ते कुणीच कुणाला सांगत नाही. मन मात्र अस्थिर असते. मग समर्थांच्या करुणाष्टकांची आठवण होते.

अनुदिनी अनुतापे तापलो रामराया।
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया॥
अचपळ मन माझे नाव रे आवरिता।
तुजविण शीण होतो धाव रे धाव आता॥

मनस्तापाने तुम्हाला रक्तदाब नसला तरी वाढेल किंवा एकदम 'लो' होईल. तेव्हा कितीही संताप, त्रस्त झालात, तरी एक ते दहा अंक मोजत रहा तो दहावा अंक संपायच्या आत तुमचा संताप एकदम 'नॉर्मल' होऊन जाईल. उरलेल्या अशान्त अवस्थेत तुम्ही -

ठेविले अनंते तैसेची रहावे।
चित्ती असू द्यावे समाधान।

ह्या संतवचनाचे स्मरण करा. समाधानी वृत्ती ठेवून आघात सहन करणे आणि धैर्याने पुढील वाटचाल करणे हीच खरी समर्थांची शिकवण आहे.

विचारेविण बोलो नये, विवंचने विण चालो नये।
मर्यादेविण हालो नये। काही येक॥

विचार केल्याशिवाय बोलू नये, सर्व बाजू ध्यानांत घेतल्याशिवाय आपले मतप्रदर्शन करू नये. नीती धर्माच्या मर्यादा पाळल्यावाचून हालचाल करू नये. जेथे जायचे असेल तेथील वाटेची माहिती विचारल्या शिवाय जाऊ नये. एखादे फळ कसले आहे हे माहिती करुन घेतल्याशिवाय खाऊ नये. रस्त्यात वा अन्यत्र पडलेली एखादी वस्तू चटकन् उचलून घेऊ नये. आज एकविसाव्या शतकात प्रवेश करताना सुद्धा समर्थांचीच शिकवण कशी उपयोगी पडते आहे याचे एक नित्याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. आज आपण बसमधे, रेल्वेमधे, विमानतळावर सगळीकडे जनतेकरता खास सूचना दिलेल्या असतात. " बेवारशी, रस्त्यात पडलेल्या वस्तूंना हात लावू नका त्यांना हाताळू नका, उचलून घेऊ नका, त्यामुळे तुमच्या जीवाला धोका आहे अशी वस्तू आढळल्यास जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधून त्वरित माहिती घ्यावी."

" अतिवाद करू नये पोटी कपट धरू नये।
शोधल्या विण करू नये कुळहीन कांता॥"

समर्थांच्या या उपदेशामध्ये केवढा उपदेश भरलेला आहे. फार वादविवाद करू नये. पोटामध्ये कपटी भाव धरू नये. मुलीच्या कुलशीलाची माहिती करून घेतल्याशिवाय लग्न करू नये. मनुष्याने वादविवाद करण्यापेक्षा सुसंवाद साधावा त्याने दुमत न होता एकमत होण्यास मदत होइल.

तुटे वाद संवाद तो हितकारी।
तुटे वाद संवाद त्याते म्हणावे ॥

सुखसंवाद अवश्य करावा. कपट कर्मांची फळे चांगली नसतात. मात्र दुसऱ्याच्या मनातील कपट ओळखले पाहिजे. जरी दुसऱ्याच्या मनात कपट असेल तरी तुम्ही चांगल्याहेतूने एखादी गोष्ट केलीत तर तुमचा सद्हेतु, सदविचार, तुम्हाला दुसऱ्याच्या मनातले कपट नष्ट करावयास, मदतच करेल. पूर्ण विचार करुन, तिचा सांगोपांग, सर्वांगानी आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून, घेतलेला निर्णय केलेली कृती विश्रांतीच फलस्वरुप, मनशांती देणारी ठरते.

मर्यादा सोडून बोलणारा मनुष्य हा तोंडाळ, नुसतीच बाष्फळ बडबड करणारा, असतो. त्याच्याशी भांडण होऊ देऊ नये तसेच जो बाष्फळपणे बडबडतो त्याच्याशी वादविवाद कधीच घालू नये.

तोंडळासि भांडो नये। वाचाळासी तंडो नये।
संतसंग खंडू नये अंतर्यामी ॥

या दोन गोष्टींमुळे मन:शांती नष्ट होते, तुम्हाला राग आला, क्रोध आला, तरी त्यामुळे तुमचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. क्षणाक्षणाला रागावणारी माणसे लोकांमध्ये अप्रिय होतात. खोटी प्रौढी मिरवू नये. यातूनच पुढे अहंकार निर्माण होऊन लोक तुमचा तिरस्कारच करू लागतात. फक्त पराक्रमाचे कृत्य हातून घडले तरच इतरांना सांगावे; आपल्या पराक्रमाची, हिंमतीची, कथा इतरांना प्रेरणादायी ठरते.

आपल्या मनातल्या भावना, दु:ख, वेदना, मनातल्या मनांत दाबून ठेवू नका. मनातला राग कुणाजवळ शब्दांमध्ये व्यक्त करा, त्यामुळे तुमचे मन मोकळे होऊन नवीन विचार येण्यास जागा होईल. ज्याप्रमाणे इंजिनाची वाफ बाहेर जाते तसे मनातला भावनावेग त्यावरचे झाकण काढून बाहेर पडू द्या. मगच तुम्हाला आयुष्याची वाटचाल करायला पुन्हा नव्याने शक्ती येईल.

दुसऱ्यांशी संवाद साधून वाद मिटवलात आणि सुसंवाद नम: असे नमन केलेत तर तुमचे या इहलोकीचे गमन फलदायी होईल. सुसंवादायनम: हा मंत्र माझ्या मते रामनामापेक्षा अधिक प्रभावशाली आहे हे तुमच्या नक्कीच लक्षात येईल. रामनाम हे जरी तारक असेल तरी सुसंवाद हा जीवनाला प्रेरक आहे आणि वादाला तितकाच मारक आहे.

---

सुरेश देशपांडे
१/२, जान्हवी अपार्टमेंट, चरई, ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी : ५४३ ०११८

•••

**७ मार्च रोजी दास नवमी आहे. रामदासांचे विचार, तत्वज्ञान यांच्या पार्श्वभूमीवर वरील लेखातील आशय लक्षात घेण्यासारखा, आचरणात आणण्यासारखा आहे.**

# आरोग्याचे शिल्पकार !

## निरामय जीवनासाठी अध्यात्माची जोड !

होऊ देत सुखी सारे ! सर्वां आरोग्य लाभू दे ॥
मांगल्य सर्व पाहोत ! न कोणा दुःख होऊ दे ॥

जीवन संगीत सुरेल होण्यासाठी 'ॐ' हा पहिला स्वर सुरेख रीतीने हाताळता येणे आवश्यक आहे. यासाठी पहाटे ४ ते ६ या वेळात ११ वेळा ओंकार साधना आरोग्यास लाभदायक. कारण पृथ्वी तलावरील पहिला नाद ओंकार होय. याचबरोबर प्राणायाम किंवा ध्यानधारणा केल्यामुळे आपल्याला शारीरिक व मानसिक स्थैर्यही लाभते. हे करीत असताना शास्त्रोक्त हस्तस्थितीचा वापर करावा. नाहीतर वरील दोन्हींचा अपेक्षित लाभ मिळत नाही. मनगट गुडघ्यांवर ठेवताना तळहात जमिनीच्या दिशेने ठेवावेत, परंतु हात मांडीच्या पुढे लोंबते न राहता मांडीवर राहतील असे पहावे.

आपण सेवन केलेल्या अन्नाचे चर्वित-चर्वण व्यवस्थित होण्यास शरिरातील आतड्यांचा महत्वाचा वाटा आहे आणि या आतड्यांनाही सुयोग्य व्यायाम मिळाल्यास ते कार्यक्षम रहातात. तुम्ही म्हणाल आतड्यांना व्यायाम हा काय प्रकार आहे आणि कसा करता येईल ? तर आपली पूर्वापार चालत आलेली गायत्री मंत्र व ओंकाराची साधना करूनच पहा. स्नानानंतर १० किंवा २८ वेळा गायत्री मंत्र म्हणणे, शिवाय सकाळी आधी सांगितल्याप्रमाणे आणि रात्री झोपतानाही कमीत कमी पाच वेळा तरी ओंकार म्हणणे. अशाप्रकारे रोज रात्री पाठ टेकायच्या वेळेस, परमेश्वराने आपणांस दिलेल्या प्रत्येक अवयवाचे आभारही मानले जातील. कारण आपल्या आयुष्यात घडत राहणाऱ्या सर्व घटनांचा कर्ता-करविता परमेश्वरच आहे. म्हणूनच जो माणूस परमेश्वरी इच्छेचा आदर राखून जीवन जगतो तो निर्भय असतो.

नामस्मरणाचा महिमा अगाध आहे याची प्रचिती येते. एका तासाच्या ध्यानाने आठ तासाच्या निद्रेचे समाधान मिळते. म्हणजेच साधना कोणत्याही स्वरूपाची असली तरी मनापासून केल्याशिवाय अध्यात्मिक उन्नती होत नाही आणि जे मनापासून योगसाधना करतात, त्यांना काही निराळीच अनुभूती येते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण पृथ्वीवर पाय टेकतो, तेव्हा " समुद्र वसने देवी पर्वतःस्तन मंडले ! विष्णुपत्नी नमःस्तुभ्यम् पादस्पर्श क्षमस्वमे !" हा श्लोक म्हणून पृथ्वीची प्रथम क्षमा मागतो आणि मगच आपल्या दिवसाची सुरुवात करतो. हल्ली आपण फॅशन म्हणून पायात स्लीपर वापरतो, परंतु पृथ्वीस आपला पाय टेकल्यावर पृथ्वीतत्व जागृत होऊन आपला पृथ्वीशी संबंध येतो, ही सुध्दा आरोग्यदायी गोष्ट आहे. तसेच सकाळी उठल्यावर अनशापोटी तांब्याच्या तांब्यातील १-१॥ लिटर पाणी पिणेही प्रकृती स्वास्थास खूपच चांगले. प्रयोग करून पहायला हरकत नाही. तसेच सकाळी उठल्यावर आपल्या तोंडात जे बॅक्टेरिया तयार झालेले असतात, ते पाणी प्यायल्यावर पोटात जातात. ते विषारी जंतूंना प्रतिकारक म्हणून उपयुक्त ठरतात. अशाप्रकारे अनशापोटी भरपूर पाणी प्यायल्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रासही होणार नाही. आणि आपण म्हणतोच ना, पाणी हे जीवन म्हणजेच आपला प्राण आहे. असे केल्याने शरीरात पाण्याचा प्रवाह योग्य ठेवण्यास मदत होईल.

सकाळी प्रातर्विधी उरकून आणि नाश्ता करण्या आधी शक्यतो आठच्या आत पाऊण तास तरी मोकळ्या हवेत फिरायला जावे. त्यांमुळे आपण निसर्गाशी एकरूप होतो. आणि सध्याच्या धकाधकीच्या जीवनात दुर्मिळ अशी प्रदूषणरहित हवा याच वेळी मिळू शकते. फिरून आल्यावर अर्धा तास शवासनात पडून राहिल्यास जास्त

चांगले. त्यानंतर थोडा नाश्ता करणे हितकारक. आणखी एक गोष्ट सांगायची राहिली, ती म्हणजे आरोग्यवर्धिनी तुळस आणि वृक्ष पहाटेवेळी जो प्राणवायू सोडतात, त्यामुळे आपले आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.

सकाळी उठल्या-उठल्या आपल्याला प्रसन्न वाटावे म्हणून आपण बहुसंख्यजण गरम-गरम चहा पितो. खरं म्हटलं तर, चहा हे परदेशी पेय असून ही आपल्या भारतात इतके लोकप्रिय झाले आहे की, उठल्या-उठल्या चहाचा आस्वाद घेतल्याशिवाय चैनच पडत नाही. चहामुळे काहीवेळेस प्रसन्नता वाढत असली, तरी आपल्यास आरोग्य विघातक असेही हे पेय आहे. विचार केला तर, असे लक्षात येते की, उठल्यानंतर काही तरी पेय आपण पितो. म्हणजेच रात्री जेवल्यानंतर सकाळी पेय पिण्यापर्यंत या कालावधीत कितीतरी तास लोटलेले असतात. तर डॉक्टरांच्या मते, चहाचे दुष्परिणाम पाहिल्यास चहा पिऊच नये, पण चहा न पिता अगदीच राहवत नसेल तर काही तरी खाऊन मगच चहा प्यावा.

जेवण झाल्यावर लगेच वज्रासनात बसल्यास पोटातील गॅसेस् निघून जातात. गॅसेस्मुळेच पुष्कळ गोष्टी आपली तब्येत बिघडण्यास कारणीभूत ठरतात. वज्रासनात बसल्यामुळे पोटावर दाब येऊन पोटाचा आकारही वाढू शकणार नाही.

व्यायामामुळे आपले शरीर सुडौल होते, मन:शांती मिळते, विचारांना योग्य वळण लागते, या स्वामी विवेकानंदांच्या वैचारिक दृष्टिकोनाची प्रचिती येण्यासाठी आपण थोडाफार व्यायाम करण्यास उद्युक्त व्हाल यात शंकाच नाही.

सध्याच्या या धकाधकीच्या आणि प्रदूषणाच्या जंजालात अडकलेल्या आपल्या शहरी वातावरणातील या विसाव्या शतकात आज चाळीशीच्या आसपास डोके दुखी, स्पाँडिलायटिस, पाठीचे विकार, ॲसिडिटी अशाप्रकारचे अनेक विकार माणसाला सतावू लागले आहेत. या वेगवेगळ्या रोगांना शह देण्यासाठी नवनवीन औषधे बाजारात विक्रीस येत असून यावर वैद्यक शास्त्रात निरनिराळे शोधही लागत आहेत. परंतु शरीराला पूर्णत: आराम पडेल, रोग समूळ नाहीसा होईल असा खात्रीशीर इलाज म्हणजेच ॲक्युप्रेशर पध्दती.

या ॲक्युप्रेशर पध्दतीत कुठल्याही प्रकारचे दुष्परिणाम होत नाहीत. ही उपचार पध्दती सरळ साधी पण परिणामकारक अशी आहे. रोग झाल्यावर बरा करण्यापेक्षा मुळातच त्याला प्रतिबंध घालणे चांगले. ॲक्युप्रेशरमध्ये 'रोग्यावर उपचार न करता रोगावर उपचार करणे हा मूलभूत सिध्दांत आहे. या पध्दतीबरोबर रेकी, निसर्गोपचार पध्दती, होमिओपॅथिक अशा प्रकारच्या दुष्परिणाम विरहित आणि वेदनाविरहित उपचार पध्दतींची जोड दिल्यास रोगी लवकर बरा होतो असा अनुभव आहे. या उपचार पध्दतीमुळे मन खंबीर बनण्यासही मदत होते. तसेच मानवी शरीराचा सर्वात महत्त्वाचा व आकर्षित असा आपला चेहरा, ज्याला आपण मनाचे प्रतिबिंब म्हणतो, तो चेहरा उजळ राहण्यासाठी साबणाची नाही, तर मनाची प्रसन्नता आवश्यक आहे.

### सुदृढ शरीर - सशक्त मन

आपले सर्व जीवन सहज साध्या अशा श्वासावर अवलंबून असते. मानवाला व्याधींचे निराकरण करावयाचे असेल तर श्वासावर नियंत्रण असणे अत्यावश्यक आहे. या श्वसन प्रकारामुळे आपल्या शरीरात प्राणतत्व तयार होत दृष्टी स्थिर होते. घ्राणेंद्रिये स्वच्छ होतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हृदयाभिसरण क्रियेमध्ये रक्त शुद्ध होते. रक्तशुद्धीकरणाची प्रक्रिया पूर्णपणे आपल्या श्वासावर अवलंबून आहे. स्पाँडिलायटिसचा त्रास असलेल्यांना हे श्वसन प्रकार केल्यानंतर मानेला पट्टा लावणे थांबवता येते. प्रत्येक जीवाला श्वास मिळतो ही ईश्वरी कृपा आहे. त्याचा

सदुपयोग केला पाहिजे. त्याची उपलब्धता योग्यप्रकारे मिळविता आली पाहिजे. या ईश्वरी कृपेमुळेच आपण आपल्या सर्व जीवनावर नियंत्रण करीत असतो. तसेच आंतरिक शुद्धतेसाठी प्रयत्न केले पाहिजे. ही नम्रता आपल्याला देवत्व प्रगट करते. शिवाय सत्संगामुळे जीवनातील ध्येय गाठता येते. महर्षी श्री शंकराचार्य यांच्या म्हणण्यानुसार सत्संगामुळे जीवनात उत्क्रांती घडून मुक्ती प्राप्त होते.

ज्या व्यक्तीला समाधानाचा सूर गवसतो, त्याचे सुख सूर्यप्रकाशासारखे असते. अशाप्रकारे रंगभूमीवर जसे नेपथ्य आवश्यक असते, तसेच मानवी, जीवनाच्या विविध छटा सुंदरतेने भरण्यासाठी वरील सर्व छटांनी प्रत्येकाने आपले जीवन भारून टाकले तर, निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आपल्याच हाती नाही का ? म्हणजेच सुखी माणसाचा सदरा आपलाच!

शुभ चिंतावे-शुभ इच्छावे-वचनी शुभ बोलावे।

सत्कर्माच्या पुण्याईने जन्माचे सार्थक करावे ॥

सौ. अपर्णा काजरेकर
ठाणे
दूरध्वनी क्रमांक - ५३३ ४२ ७१

...

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्र पदवी परीक्षेचा एक अनिवार्य भाग म्हणून विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या रूपाने एक संदर्भ साधन बनवावे लागते. या अंतर्गत सूची किंवा कारण असा पर्याय ते निवडू शकतात.

या अभ्यासक्रमाच्या वि.प्र. मंडळाने आमच्या महाविद्यालयात चालविलेल्या अभ्यासक्रमात फार महत्त्वपूर्ण 'Data Base' तयार झाला आहे. स्थानिक लेखक कवी यांच्या साहित्याची सूची, ठाण्यातील संस्थांची सूची, परिसरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची सूची, गीतेतील तत्त्वज्ञानात्मक संभाषणांची सूची इ. संदर्भ साधने तयार आहेत. यातील काही प्रकल्प पुस्तक रूपाने आल्यास अभ्यासकांची मोठीच सोय होईल. तरी याबाबत ज्यांना अधिक जाणून घ्यावयाचे आहे, प्रसिद्धीच्या दृष्टीने मदत करायची आहे अशा जाणकार वाचकांनी आमच्या महाविद्यालयातील ग्रंथालयाशी संपर्क साधावा.

श्री. जी. पाटील
केंद्रप्रमुख व प्राचार्य
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

# इंधन वाचवण्यासाठी : भाग ३

*इंधन वाचवण्या संबंधीच्या प्रशिक्षण वर्गाला दिले जाणारे प्रशिक्षण सर्वसाधारण गाडी चालवणारासाठी उपयुक्त आहे. विषयानुरोधाने अपघाताचा विचारही या भागात आला आहे. - संपादक*

इंधन वाचविण्याचा प्रयत्न केलात की सुरक्षित ड्रायव्हिंग होणार आहे. ज्या पध्दतीने चढावावर चढतो त्याच पध्दतीने खाली उतरा. फक्त ॲक्सिलेटरवरचा पाय काढा. गाडी सांभाळण्याकरता जितके ब्रेक जास्त माराल तितका तेलाचा खर्चही जास्त वाढतो. आणि टायर ट्युबची घिसावट ही वाढते. आणि म्हणून सांगितलं, चढावर चढताना आणि चढावावरून खाली उतरताना टॉप गिअरचा वापर करा. क्लच आणि ॲक्सिलेटर ताब्यात ठेवून गाडी उभी करू नका. पण बऱ्याच चालकांना अशी सवय असते, अर्धाक्लच सोडलेला असतो. आणि इकडे इंजिन रेज केलेलं असतं अर्धा क्लच रेज केल्यामुळे क्लचप्लेटचे नुकसान आणि इंजिन रेज केल्यामुळे तेलाचा खर्च वाढतो. ॲक्सिलेटर ताब्यात ठेवून गाडी उभी करू नका. अशा ठिकाणी ज्यावेळी उभं राहायचं असेल त्यावेळी गाडीचा ब्रेक मारून गाडी उभी करा. पुढला अडथळा दूर झाल्यानंतर योग्य तो गिअर घ्या. आणि आपल्या कामाला लागा. असे न केल्यास एक क्लचचे नुकसान होते आणि इंजिन रेज केल्यामुळे तेलाचा खर्च होतो. या करिता ब्रेक मारून गाडी उभी करा.

मी सांगितलं की झटके देऊन गाडी चालवू नका. झटके हे दोन प्रकारचे असतात. एकदम क्लच सोडल्यामुळे झटका बसतो किंवा एकदम ॲक्सेलिटर दाबला आणि सोडला तरी झटका येतो. असे दोन प्रकारचे झटके गाडी चालवताना बसतात. या झटक्यांचा परिणाम जे मागले ट्रान्समिशन पार्ट आहेत त्या ट्रान्समिशन पार्टचे नुकसान होण्याचा संभव असतो. आणि ह्यातला कोणताही पार्ट रिपेयरिंग करायच्या लायकीचा नाही. नवीन बसवावा लागेल. जॉईंटला टाका बसला व तो असा फाटला तर तो रिपेयर करता येत नाही. तुटला तर भंगारात फेकून द्यायचं नाहीतर नवीन बसवायच इतकं जबरदस्त नुकसान या ट्रान्समिशन पार्टचं आपल्यामुळे होते. तेव्हा आस्ते-आस्ते क्लच सोडा आस्ते-आस्ते ॲक्सिलिटर कमी करा त्यामुळे येणारे झटके कमी होतील. आणि होणारे नुकसान टळेल. मिळालेल्या गतीचा फायदा घ्या. असं शीर्षक सांगितलं. गाडीला एक गती आहे. कौशल्याने गाडी चालवा. जेणेकरून गाडीवरून उतरल्यावर मी थकलो आहे असे वाटता कामा नये. ड्रायव्हिंग ही एक कला आहे, हे लक्षात ठेवा. पोट भरण्याचा धंदा नाही. कला सांभाळायची आणि पोट भरायचं. जसं आपण पेटी वाजवतो, तबला वाजवतो किंवा गातो, या जशा कला आहेत, तशी ड्रायव्हिंग ही एक कला आहे. आणि ती कला अबाधित ठेवून आपल पोट भरायचं आहे. पोट भरण्याकरिता ड्रायव्हिंग करायचं अशी जर कोणाच्या मनात कल्पना असेल तर ती काढून टाका. कलेला महत्त्व आहे. आणि म्हणून आपण ड्रायव्हरला स्किल्ड वर्कर म्हणतो. कंडक्टर आणि ड्रायव्हरमध्ये हा फरक आहे. सिनियारीटी जर अशी बघितली असेल आणि एका पोस्ट करता निवड करायची असेल तर ड्रायव्हरची सिनियारीटी जास्त मानली जाते. आपण स्किलवाले लोक आहोत, हे लक्षात ठेवा. आणि त्याप्रमाणे आपण वागायचे. तुम्हाला दिसतं, सिग्नल बंद आहे गाड्या उभ्या आहेत आणि मलासुध्दा ह्या ठिकाणी जाऊन उभं राहायला लागणार आहे. ड्रायव्हरला समजतं की, नाही समजत ? तरी सुध्दा काही ड्रायव्हर काय करतात, आपली गाडी पळवत पळवत आणतात आणि गचकन ब्रेक मारून गाड्यांच्या पाठीमागे आपली

गाडी उभी करतात. असे चालवणारे काही ड्रायव्हर आहेत. सर्वच नाहीत. हा एक प्रकार. दुसरा प्रकार सांगतो, काही ड्रायव्हर काय करतात या ठिकाणी हाय-स्पीडमध्ये गिअर डाऊन करतात आणि टॉपकडून थर्डमध्ये येतात. जर अंतर जास्त असेल तर सेकंड गिअरसुध्दा घेतात आणि आस्ते-आस्ते या मार्गाला आपली गाडी उभी करतात. असे दुसऱ्या प्रकारे चालवणारे ड्रायव्हरसुध्दा आहेत. काही पहिल्या प्रकारे चालतात काही दुसऱ्या प्रकारे चालतात.

आता पहिल्या प्रकारात काय घडतं ? गाडी पळवत पळवत आणायची आणि गचकन ब्रेक मारायचा. गाडी पळवायची म्हणजे काय करायचं, जास्त अॅक्सिलिटर, इंजिनची चाकं वापरायची, तेलाचा खर्च करायचा आणि इथे आणून अचानक ब्रेक मारायचा. ताकद देणं आणि ताकद तोडून टाकणं या संघर्षामध्ये तेलाचा खर्च तर वाढतो पण टायर ट्यूब लायनरची घिसावट पण होते. दुसऱ्या प्रकारात काय होतं, हाय-स्पीड मध्ये गियर डाऊन करतात. तुम्हांला गिअर डाऊन कसा करायचा शिकवलेला आहे. ज्यावेळेला टॉप स्थिती मधून तुम्हाला थर्डमध्ये जायचे आहे, तेव्हा थोडा ब्रेक मारुन गाडीचा थोडा स्पीड कमी करा. आणि नंतर गिअर बदला आणि डाऊन गिअर करताना काय करायला लागतं तर गिअर डाऊन करताना स्वतःची एक मेहनत वाढतेच, म्हणून आपण जास्त अॅक्सिलिटर रेज करतो. असे एकदा करतो, किंवा दोनदा करतो ह्या गाडीच्या मागे आणून आपली गाडी उभी करतो.

या दोन ड्रायव्हिंगच्या पध्दतीत स्वतःची मेहनत ही वाढते डिझेल खर्चही वाढतो आणि टायर ट्यूबची घिसावट ही होते. असे दोन प्रकारेच ड्रायव्हिंग ड्रायव्हर लोक रस्त्यावर करत असतात. त्यांनी या दोन्ही गोष्टी करायच्या नाहीत. तर तिसरी गोष्ट सांगणार आहे, त्या तिसऱ्या गोष्टीचा उपयोग आपण करायचा आहे. सिग्नल बंद आहे, गाड्या उभ्या आहेत. तुम्ही मागाहून गाडी घेऊन येता त्या ठिकाणी आल्यानंतर तेथे ड्रायव्हरने दोन अंदाज घ्यायचे, यातला पहिला अंदाज घ्यायचाय की आपल्या गाडीचा स्पीड किती आहे. अगदी एक्झॅट कळणार नाही पण माझी गाडी ३५-४० किलोमीटरच्या किंवा ५०-५५ वेगाच्या स्पीडवरती पळतेय, एवढं समजू शकतं. हा एक अंदाज घ्यायचा आणि दुसरा अंदाज घ्यायचा की माझ्या मार्गापासून ही गाडी किंवा सिग्नल किती लांबीवरती आहे. २०० फुटांवर आहे की ४०० फुटावर आहे की ६०० फुटावर आहे. अंदाज घेता येतो. हे दोन अंदाज घेतल्यानंतर काय करायचं, फक्त या ठिकाणी अॅक्सिलेटरवरचा पाय काढून टाकायचा आणि ब्रेकवर ठेवायचा. अॅक्सिलेटर वरचा पाय काढला म्हणून गाडी थांबते का हो ? नाही थांबत ? मग एकदम स्पीड कमी होतो का ? की ४० चा एकदम ५ वर आला असं होतं का ? तसंही होत नाही. ४०, ३०, २०, १०, ५ या पध्दतीने तो कमी होत असतो. तुमच्या गाडीला मिळालेली गती आहे तीच तुम्हाला या ठिकाणावर आणून सोडेल. म्हणून सांगितलं की जी मिळालेली गती आहे तिचा उपयोग करायचाय. तेवढ्या वेळात सिग्नल तांबड्याचा हिरवा झाला. एक एक गाडी उठायला लागली, तुमच्या गाडीची मोशन तुटली नसेल तर त्याच स्पीडमध्ये जाऊ शकता. किंवा मोशन तुटली असेल तर एखादा थर्डगीयर डाऊन करू शकता.

अशा पध्दतीनेच आपल्याला इंधन वाचवायचंय. हेच काम स्पीड ब्रेकरसाठी पण करायचयं असतं. सिग्नल आपल्याला कदाचित कमी लागत असतील. पण स्पीडब्रेकर बऱ्याच ठिकाणी लागतात म्हणून मी चालकांसाठी सांगतो. जरा लांबवर बघा. स्पीडब्रेकर दिसला की आपल्या अॅक्सिलेटरवरचा पाय कमी करा, स्पीडब्रेकरच्या जवळ जाऊन थोडा ब्रेकचा इशारा करा. योग्य तो गिअर घ्या, चालायला लागा. पण आपण काय करतो ? स्पीडब्रेकर दिसला की ब्रेक मारणार. पुन्हा थर्ड, पुन्हा सेकंड, पुन्हा थर्ड, पुन्हा टॉप असे धावत करायचं आपण काम करत असतो. आपण स्किल वर्कर आहोत. हे आपले स्किल हे आपण सर्व पणाला लावायचं आहे. मी जे विवेचन केलयं

ह्या विवेचनामधले सगळेच पॉईंट तुम्हाला लक्षात राहतील असे मी मानत नाही. पण तेवढे लक्षात राहतील दोन, चार, तीन, पाच तेवढे लक्षात ठेवा. तेवढ्यांचा उपयोग गाडी चालवताना करा. मनामध्ये ठरवलं की ते होणारच.

चांगल्या ड्रायव्हरची दोन लक्षणे सांगतो ती लिहून घ्या. चांगला ड्रायव्हर कोणाला म्हणायचं, जो ड्रायव्हर स्वतः चूक करत नाही आणि दुसऱ्यांनी केलेली चूक सांभाळून घेतो. त्याला चांगला ड्रायव्हर म्हणतात. वलच अगदी ब्रेकवरती कुठलाही ड्रायव्हर आपली गाडी कंट्रोल करू शकतो त्यात विशेष नाही. पण जो ड्रायव्हर आपली गाडी आपल्या ॲक्सिलिटरवर कंट्रोल करतो त्याला चांगला ड्रायव्हर म्हणतात. दोन वहानांमध्ये टक्कर होते व त्यांची मोडतोडही होते. माणसाला आणि प्राण्यांनासुध्दा दुःखापती होतात व त्या बद्दल नुकसान भरपाईही द्यावी लागते. अशा घटनेशी आपला किंवा आपल्या संस्थेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येत असेल अशी घटना म्हणजे अपघात होय.

## अपघात

अपघाताची बरीच कारण आपणं सांगतो. त्याचे तीन भाग मी पाडणे. पहिला भाग मानवी दोष. ह्या दोषाचे प्रमाण ८० % आहे. कारण माणूस बेदरकार गाडी हाकलतो, माणूस दारु पितो, माणसाला झोप येते, दोन वाहनांमधले सुरक्षित अंतर न ठेवण्याचे काम माणूस करतो. रस्त्यावर चालणारा पादचारी माणूसच असतो. मोटार सायकल किंवा स्कूटर चालवणारा मनुष्यच असतो म्हणजे माणसाच्या चुकीमुळे होणारे अपघात ८० %. मेनमशीनरीच्या दोषामुळे होणारे ॲक्सीडंट, ब्रेक फेल झाल्यामुळे, स्टेअरींग रॉड तुटला, पुढला टायर बर्स्ट झाला अशा यांत्रिक बिघाडामुळे होणारे अपघात हे दुसऱ्या वर्गात मोडतात. त्याचे प्रमाण १५ % टक्के आहे. रस्त्यावरती चिखल झालेला आहे. अशा प्रकारच्या रस्त्यावर वाहन चालवताना जे अपघात होतात त्यांचे प्रमाण ५% आणि म्हणून एकंदर १००% अपघातचं प्रमाण तीन कारणांमुळे होत असतं.

ह्यातला पहिला ठोकर किंवा टक्कर, दुसरा प्रकार जो आहे, तो पर्सनल इन्जुरी म्हणजे माणसाला येणाऱ्या व्यक्तीगत दुखापती आणि तिसरा जो आहे साधा किंवा किरकोळ अपघात. दुसरा म्हणजे संपूर्ण मडगार्ड बेन्ड झालेला आहे. टायरला लागलेल आहे. पुढचे दिवे तुटलेले आहेत. रेडियेटर तुटलेल आहे. फॅन ब्लेड आत घुसलेला आहे. म्हणजे गाडी चालवण्यायोग्य नाही अशी अशा प्रकारचा भाग. ह्याला म्हणायचं गंभीर ठोकर. दुसरा विभाग आहे, पर्सनल इंन्जुरी. म्हणजे माणसाला होणाऱ्या दुखापती साध्या दुखापती. जरा खरचटलेलं आहे, किरकोळ मुका मार लागलेला आहे. ड्रायव्हरने झटकन ब्रेक मारल्यामुळे पॅसेंजर किंवा कंडक्टर पुढल्या सीटवर आपटलेला आहे.थोडीशी जखम झाली आहे. म्हणजे साधी जखम आणि गंभीर जखम, म्हणजे हात फॅक्चर झालेला आहे. पाय फॅक्चर झालेला आहे. डोक्याला मार लागलेला आहे. रक्तस्राव झालेला आहे. बेशुध्द पडलेला आहे. म्हणजे गंभीर जखम आणि तिसरा म्हणजे फेटल ॲक्सिडंट प्राणघातक. ऑन दी स्पॉट मेला तरी सुध्दा तो फेटल ॲक्सिडंट मानला जातो. पण ४८ तासानंतर तो खलास झाला तर तो दुसऱ्या विभागात पर्सनल इन्जुरी म्हणून येतो.

कुठल्याही अपघाताच्या वेळी गाडी जागची हलवायची नाही असा तुमच्याकडे नियम आहे. त्या ठिकाणी जो इन्स्पेक्टर असेल त्याच्याकडे केस नोंदवायची किंवा इन्स्पेक्टर त्या ठिकाणी नसेल तर चोकीमध्ये जे बुक आहे, त्यामध्ये तक्रार लिहून ठेवायची. आणि आपलं लायसन्स जमा करायचं. बी. ई. एस. टी. त कुठल्याही पोलिस स्टेशनला जायला लागत नाही. आता जो दुसरा प्रकार आहे, पर्सनल इन्जुरी, ह्यामध्ये आणखी एक जबाबदारी ड्रायव्हर कंडक्टरवर येते की माणसाला दुखापत झालेली आहे, अशा व्यक्तीला ताबोडतोब जवळच्या म्युनिसीपल रुग्णालयात किंवा सरकारी रुग्णालयात

पोचवायचं आहे. त्या माणसाला तळमळत त्या ठिकाणी ठेवायच नाही. आणि जोपर्यंत तो तळमळत असतो, तोपर्यंत रस्त्यावरचं टेन्शन वाढत असतं. तेव्हा लवकरात लवकर त्याला हलवण्याचा प्रयत्न करावा. त्या ठिकाणी ड्रायव्हर असू शकत नाही. कारण ड्रायव्हर गाडी सोडून निघून गेलेला असतो. पण आजूबाजूचे लोक हात साफ करायला आलेले असतात. त्यांच्यापासून ड्रायव्हरने बाजूला व्हायचं आहे. आपल्या घरी जाऊन बसायच नाही, तर जवळच्या पोलिस स्टेशनला जाऊन थांबायच आहे. आणि त्यांच्या मदतीने पुन्हा जागेवर यायचे आहे. कंडक्टरचा आम्ही त्यावेळेला क्लास घेतो तेव्हा कंडक्टरला आम्ही असं शिकवतो की त्यावेळेला ड्रायव्हर निघून गेलेला असतो तेव्हा संपूर्ण जबाबदारी कंडक्टरची असते. सहसा कंडक्टरच्या अंगाला कोणी हात लावत नाही. किंबहुना मदत करत असतात. तर अशावेळी कंडक्टरने त्याला टॅक्सीने म्हणा किंवा रिक्शाने म्हणा जवळच्या हॉस्पिटल मध्ये पोहचवायचं आहे. प्रत्येक हॉस्पिटलमध्ये एक पोलिस हेल्प केंद्र असतं. तर ह्या हेल्पकेंद्राच्या मार्फत आपल्या खात्याशी संपर्क साधायचा आहे, की माझा कंडक्टर नंबर अमुक-अमुक, अमक्या गाडीवर मी काम करत होतो. अमक्या गाडीला अपघात झाला. दोन माणसांना मार लागला आहे. मी त्यांना अमुक हॉस्पिटलला घेऊन आलो आहे. जर त्यांना अॅडमिट केलं असेल तर तस सांगितल पाहिजे. जर नुसत पट्टी लावून घरी जायला सांगितल असेल तर तसं आपल्या खात्याला कळवायचं आहे. ही सगळी गोष्ट आपल्या खात्याला माहीत असणे आवश्यक आहे.

आणि नंतर मात्र ऑफिसर किंवा अधिकारी आल्यानंतर मग त्या कंडक्टरची जबाबदारी कमी होते. तोपर्यंत सर्वथा जबाबदारीने काम करणे आवश्यक गोष्ट आहे. तुम्ही शहराच्या बाहेर जाता. काहीवेळा जंगलामध्ये सुध्दा असू शकता. त्याठिकाणी एखादे वाहन मिळण्याची शक्यता नसते. आणि त्या माणसाला तर वैद्यकीय मदत देणे जरूरी असते. अशावेळी ट्रेनिंग स्कूलमध्ये शिकवलं जातं, की आपली स्वतःचीच गाडी घेऊन जायचं आहे. ज्या ठिकाणी त्याला अॅडमीट करायचं आहे, त्या ठिकाणी वाहन मिळण्याची शक्यता नसते. अशा ठिकाणी स्वतःची गाडी हलवायला या कारणाकरता परमिशन दिलेली आहे. एखादी गाडी अपघात झाल्यानंतर अशी रस्त्याच्या मध्येच उभी असते आणि त्यामुळे ट्रॅफिक जाम होण्याची शक्यता आहे. तेव्हा एखादा पोलीस हवालदार किंवा इन्स्पेक्टर तुमच्याकडे येऊन सांगतो, की जरा गाडी बाजूला घ्या. बाजूला गाडी घेण्यापूर्वी त्या इन्स्पेक्टरचं नाव त्याचा नंबर तो कोणात्या पोलिस स्टेशनला अॅटॅच आहे. हे आपण लिहून घ्यावयाचे आहे. जर हे आपण लिहून घ्यायला विसरलो आणि गाडी बाजूला घेतली तर एखादा वेळेला कोर्टात तो सांगू शकतो की मला काही विचारलं नव्हतं. ड्रायव्हरने पुरावा नष्ट करण्याकरता गाडी हलवली. म्हणजे मग असा एखादा चार्ज तुमच्यावरती मारला जाऊ शकतो. हल्ली प्रत्येक पोलिस इन्स्पेक्टर नेम प्लेट लावतो. तेव्हा नाव तुम्हाला नक्की कळू शकत.

अॅक्सिडेंटची व्याख्या बघितली अॅक्सिडेंट होण्याची कारणे बघितली. अॅक्सिडंटचे तीन प्रकार आहेत आणि उपप्रकार आहेत ह्या संबंधात माहिती आपण घेतली आता ह्या पुढे अॅक्सिडंटनंतर काही माहिती गोळा करावी लागते. प्रत्यक्ष सामना जो असतो ड्रायव्हरला करावा लागत असतो. कोर्टाच्या पिंजऱ्यात ड्रायव्हर उभा राहतो कोणताही ऑफिसर राहात नाही. तर त्याच्याजवळ पुरेशी माहिती असेल तर माहिती तो आपल्या वकिलाला देऊ शकतो आणि वकील ती केस चांगल्या प्रकारे फाईल करू शकतो. पण आपल्याला माहिती नसेल तर आपण पुरेशी माहिती वकिलाला देऊ शकत नाही आणि त्यामुळे वेगळा प्रसंग निर्माण होतो. आणि म्हणून ही सर्व माहिती आपल्या डायरीत नोंद केलेली असली पाहिजे.

अपघाताचे असे जबरदस्त परिणाम हे ड्रायव्हरच्या जीवनावर होत असतात. तसेच कंपनी जीवनावर सुध्दा होतात. अपघात झाल्यानंतर जी गाडीची मोडतोड झालेली आहे ती रिपेयर करायला लागते. जोपर्यंत ती गाडी रिपेयर होत नाही तोपर्यंत रस्त्यावर जाऊ शकत नाही. गाडी जोपर्यंत रस्त्यावर जात नाही तो पर्यंत मिळणार उत्पन्न बुडतं. पण कंपनी मोठी असल्यामुळे ते सहन करू शकते. एका नाण्याला जशा दोन बाजू आहेत, एक चांगली, एक वाईट, वाईट बाजू सांगितली. चांगली बाजू ही आहे की अपघात झाला नाही तर दोन्ही ठिकाणी व्यवस्था व्यवस्थित असते. ड्रायव्हरचे जीवन ही व्यवस्थित चालते आणि कंपनीचा कारभार सुध्दा सुरळित चालला जातो. अशाप्रकारचे ड्रायव्हरच्या जीवनावरती बरे-वाईट परिणाम हा अपघातामुळे होत असतात.

मोटार व्हेइकल अॅक्ट हा १९३९ सालचा आहे. याच्या अंतर्गत हा आपल्याला लायसन्स आणि बॅच मिळतो. या कायद्यामध्ये काही कारणासाठी बदल करावे लागतात. तशा प्रकारच्या परिस्थितीप्रमाणे असा बदलेला अॅक्ट १९८२ च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये झाला.

कुठल्याही गोष्टीशी आपला संबंध येतो त्या गोष्टीची संपूर्ण माहिती असणं आवश्यक आहे. १९८२ च्या ऑक्टोबर महिन्यात जो बदल झाला तो असा झाला. पूर्वी मोठमोठे लोक जे असत ते आपल्या घरी एक दोन गाड्या बाळगत असत. एखादा ड्रायव्हर आपल्या घरी नोकरीला ठेवत असत. संध्याकाळच्या वेळेला एखादया पार्टीला सुध्दा गाडीने बाहेर पडत असत. आणि येताना एखादया माणसाला उडवून येत असत. रस्त्यावर जो मनुष्य असेल तो नंबर घेऊन पोलिसांना कळवत असे की अमुक-अमुक गाडीने अॅक्सीडेंट केला. मग पोलीस त्या मालकाकडे जात असत. मालक नेहमी सांगत असे आहो मी तुमच्याकडे येणारच होतो. माझी गाडी चोरीला गेलीय, तक्रार करायला. आमच्याकडे गोविंदा ड्रायव्हर आहे तो गाडी घेऊन गेलेला असावा. त्याने कदाचित अॅक्सिडेंट केलेला असावा. म्हणजे मालक नामानिराळा राहणार. पोलिस गोविंदाला पकडत असत. त्याची केस चालत असे त्याला शिक्षा किंवा दंड होत असे. आणि ह्या अशा तऱ्हेचे ज्याला मार लागलाय ज्याचा हात फॅक्चर झालाय, पाय फॅक्चर झालाय त्याचं काय ?

आणि म्हणून कायदयामध्ये बदल केला की तू अॅक्सिडेंट कर किंवा गोविंदाने करू दे गाडीचा मालक तू आहेस ना ? पैसे तू भर. अशा तऱ्हेचा भाग या अॅक्टमध्ये दुरुस्त केला. समजा हात फॅक्चर झालाय, पाय फॅक्चर झालाय अशा स्वरुपाचा अपघात असेल तर दहा हजार रुपये कलेक्टर कचेरीमध्ये तातोडतोब त्याने भरले पाहिजे. एखादा माणूस गेला तर तातोडतोब पंचवीस हजार रूपये कलेक्टर कचेरीत भरले पाहिजेत. आणि क्लेम कोर्टची ज्यावेळेला केस चालेल आणि त्यावेळी क्लेम कोर्टाचा आदेश येईल नुकसान भरपाईचा, त्याबरोबर ते पैसे त्यांना मिळाले पाहिजेत. अशा तऱ्हेचा या अॅक्टमध्ये बदल केला गेला.

आपल्याला जी आवश्यक माहिती पाहिजे. तेवढी देण्याचा मी प्रयत्न केलाय. ती लक्षात ठेवायची आहे. आणि असा कधी प्रसंग कोणावर येऊ नये. पण आलाच तर त्याच्याशी तोंड देण्याची आपली तयारी पाहिजे. यासाठी या विषयाकडे मी बघितलं, आणि त्याबद्दल तशी माहिती दिली गेली. धन्यवाद !

---

**श्री. वि. ना. कोपरकर,**
शंकर मंदिराजवळ, कळवा,
ठाणे - ४०० ६०५.
दूरध्वनी : ५३७ ०२०७

•••

# ललित साहित्य : बदलते संदर्भ

*ठाण्यातील समर्थ सेवक मंडळाच्या कै. ती. गो. पंडितराव व वक्तृत्व स्पर्धेत गेल्या वर्षी झालेले हे एक उल्लेखनीय भाषण, समर्थ समितींच्या सहकार्याने देत आहोत. - संपादक*

शब्द आणि अर्थ यांचे अर्थपूर्ण सह अस्तित्व म्हणजे साहित्य. साहित्याच्या अनेक प्रकारांपैकी ललित साहित्य हा एक प्रकार आहे. सौंदर्याचा प्रत्यय देणारे साहित्य, जीवनातील अनुभवांची अभिव्यक्ती करणारे साहित्य म्हणजे ललित साहित्य. ललित साहित्य हा वर्तमानाचा आधार घेऊन उगणारा एक प्रकार आहे. वास्तवाचा आविष्कार करताना साहित्यिक आपल्या प्रतिभेने व कल्पनाशक्तीने जे जे मंगल, जे जे उदात्त यांचे दर्शन घडवत असतो पण त्याच बरोबर जीवनातील, प्रश्न ही साहित्याचे अविभाज्य अंग बनते.

साहित्यिक हा समाजाचाच एक भाग असतो. त्या समाजात तो राहतो त्या समाजात जसजसे बदल घडत जातात तसतसे बदल साहित्यात उमटणे सहाजिकच आहे. गेल्या ५० वर्षांचा साहित्यातील बदलाचा आढावा घेतला तर बदलत्या समाज मनाचा हा आरसा आहे.

भारताचा स्वातंत्र्यपूर्व कालखंड - राजकीय, सामाजिक, वैचारिक आंदोलनाचा कालखंड होता. मार्क्सवाद, गांधीवाद, समाजवाद इ. नवे विचार साहित्यात रुजत होते. पण मराठी साहित्यात मात्र याचे क्षीण पडसाद उमटत होते. हे नवे विचार साहित्याला रंजक बनवण्यासाठीच वापरले गेले. वास्तवाचे दर्शन किंवा भोवतालच्या परिस्थितीचे भान या व्यतिरिक्त काव्यमय आभासाचाच आविष्कार साहित्यात होत होता. डॉ. केतकर, साने गुरुजी, वामन मल्हार जोशी इ. नी सामाजिक भान ठेवून लेखन केले खरे, पण ते अपवादच !

१९४५ नंतरचा कालखंड समकालीन साहित्याचा. यात समकालीन साहित्यात-समकालीन जीवनाचे, जाणिवांचे मानवाच्या इच्छा आकांक्षांचे वेदना विद्रोहांचे चित्रण आढळते. दुसऱ्या महायुद्धानंतर साहित्यात दोन दृष्टिकोन उदयाला आले, एक म्हणजे आशावादी आणि दुसरा निराशावादी. मानवी जीवनाची क्षणभंगुरता, प्रचंड नरसंहार, जाळपोळ, युद्ध यामुळे साहित्यात निराशावाद आला तर दुसरीकडे भारताला स्वातंत्र्य मिळाले, समता बंधुता, लोकशाही प्रस्थापित झाल्यामुळे प्रचंड आशावाद साहित्यात रुजला.

प्रत्येक काळात वाचनाची तात्कालिक गरज भागविण्यासाठी मनोरंजन पर लेखन केले जाते. त्याला समाजाच्या सांस्कृतिक जीवनात स्थान ही होते. पण हे लेखन रंजक, काव्यमय आभास निर्माण करणारं असल्याने ते समकालीन नाही. माझ्या विवेचनात मी अशा साहित्याचा समावेश केला नाही. १९४५ चा कालखंड हा मर्ढेकरांचा कालखंड रखरखीत वास्तव, ढासळती मूल्ये चित्रण करणाऱ्या त्यांच्या कविता उदा. युद्धकालीन अभंगात ते म्हणतात,

प्रेमाचे लव्हाळे
सौंदर्य नव्हाळे, शोधू ?
आसपास मुडद्यांची रास

ही युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती वर्णन करुन पुढे ते म्हणतात,

पृथ्वीची तिरडी
एरवी परडी
फुलांनी भरली

असा निराशावादी दृष्टीकोन मर्ढेकर व्यक्त करतात. तर याच काळातले शरदचंद्र मुक्तिबोध नवी कविता मध्ये 'नवी कविता हृदयी धगधग करी नवा सविता' असा आशावादी दृष्टिकोन व्यक्त करतात.

जे कार्य मर्ढेकरांनी काव्यक्षेत्रात केले तेच कार्य कथा क्षेत्रात गाडगीळांनी केले. पूर्वीच्या कथा रंजक आणि तंत्रकुशल होत्या व त्यात समाज आणि व्यक्ती यांच्या प्रतिक्रियांना स्थानच नव्हते. गंगाधर गाडगीळ अरविंद गोखले, पु. भा. भावे यांनी कथेला नवीन वळण दिले. मध्यमवर्गीयांचे चित्रण कथांमधून होऊ लागले. बिनचेहेऱ्याची संध्याकाळ मध्ये रस्त्यावर मरून पडलेल्या माणसाबद्दल उदासीन असणारी माणसे दाखवताना गाडगीळ मध्यम वर्गीयांमधील मूल्यहीनतेचा उपहास करतात, तर गोखल्यांच्या 'निष्ठा' मधील 'उर्मिला', 'रिक्ता' मधील रंगनाथची बाबको मूल्ये जपताना दिसतात. तर भावे नवी आणि जुनी मूल्ये यांची सांगड घालून नवकथाच लिहितात.

व्यंकटेश माडगूळकरांची माणदेशी माणसे, गावाकडल्या गोष्टी, शंकर पाटील यांची ऊन, भेटीगाठी. द. मा. मिरासदार यांची भुताचा जन्म, माझ्या बापाची पेंड इ. कथांमध्ये ग्रामीण परिसर, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, मूल्ये चित्रण यांचे दिसते. सर्व कथांमधून ग्रामीण जीवनातील समस्यांचा वेध घेतला जातो.

या कालखंडातील अत्यंत महत्वाच्या अशा दोन कादंबऱ्या म्हणजे मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' आणि विश्राम बेडेकरांची 'रणांगण'. पूर्वीच्या सारखे कादंबऱ्यांचे मनोरंजनपर रुप बदलून त्यांच्यात प्रादेशिक वास्तवाचे दर्शन घडू लागले. रात्रीचा दिवस मध्ये मर्ढेकर नायकाच्या एका दिवशीच्या संध्याकाळपासून कवी तासांचे वर्णन करतात तर रणांगण मध्ये २०व्या शतकातील हताश माणसाचे चित्रण आढळते. या नंतर याच काळातील र. वा दिघे यांची 'पाणकळा' ही या प्रादेशिक कादंबऱ्यांची सुरुवात मानावी लागेल १९४५ नंतरच्या सर्वच कादंबऱ्या प्रादेशिक स्वरुपाच्या होत्या उदा. गो. नी. दांडेकरांची शितु, पडघवली, पेंडशांचा गारंबीचा बापू, रथचक्र, माडगूळकरांची बनगरवाडी.

समकालीन साहित्याचा दुसरा टप्पा म्हणजे १९६० नंतरचा कालखंड. १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी केले धम्मचक्र प्रवर्तन आणि १९६० साली झालेली महाराष्ट्र राज्याची स्थापना यामुळे मराठी साहित्याला नवे वळण मिळाले. १९६० मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेमुळे प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर प्रचंड अस्वस्थता होती तर दुसरीकडे अनेक वर्ष दारिद्र्यात अज्ञान गुलामगिरीत जखडलेला वर्ग जागा झाला आणि त्याला मानवी अधिकारांची जाणीव झाली. दलित साहित्य चळवळ, दलित पँथर इ.संघटनांमुळे या वर्गाला आत्मभान प्राप्त झालं आणि हा वर्ग लिहू वाचू लागला. एका बाजूला अत्यंतिक व्यक्तिवाद तर दुसऱ्या बाजूला जहाल परिवर्तनवाद अशा परस्परविरोधी स्तरावर हा वर्ग लिहू लागला आणि त्यामुळे दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, बौद्ध, ख्रिस्ती, जैन, मुस्लिम अशा अनेक चळवळी सुरु झाल्या.

भालचंद्र नेमाड्यांची 'कोसला' ही या काळातील महत्त्वाची कादंबरी. खेड्यातून शिक्षणासाठी पुण्यात आलेला एक तरुण-पांडुरंग सांगवीकर शिक्षण संपवून परत खेड्यात जातो आणि जीवनाचा निमूट स्वीकार करतो ऐवढीच या कादंबरीची कथा आहे. तो समाजातील दांभिकता उघड करतो पण स्वतः भव्य, दिव्य, क्रांतिकारक असे काही करु शकत नाही.

भाऊ पाध्यांची वॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर, दीनानाथ मनोहरांची 'रोबो' किंवा खानोलकरांची त्रिशंकू या रुढ कादंबऱ्यांपेक्षा अगदी निराळ्या आहेत. ग्रामीण जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या म्हणजे हमीद दलवाईंची

'इंधन' ज्यात कोकणातील हिंदू-मुस्लीम संघर्ष चित्रित केला आहे. शंकर पाटलांच्या 'टारफुला' मध्ये ग्रामीण सत्तासंघर्ष चित्रित केला आहे तर आनंद यादव 'गोतावळ्यामध्ये' यांत्रिकीकरण, व्यापारीकरण चित्रित करतात. जयवंत दळवींच्या 'चक्र' किंवा भाऊ पाध्यांची 'वासुनाका', मधुमंगेश कर्णिकांची 'माहीमची खाडी' मध्ये मुंबईतील झोपडपट्ट्यांचे चित्रण आढळते.

या कालखंडात अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. दलित कादंबऱ्यांमध्ये अशोक व्हटकरांची 'मेललं पाणी' मध्ये चांभार जीवन चित्रित केले गेले तर केशव मेश्रामांची 'जटायु' मातंग तरुणाची कहाणी आहे. गौरी देशपांडेच्या साहित्यामध्ये आधुनिक स्त्री दिसते.

कथेच्या क्षेत्रात आधुनिक स्त्री, तिच्या मनाचा कोंडमारा सानिया, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर चित्रित करतात तर दिलिप चित्रे विसाव्या शतकातील माणसाची अस्वस्थता चित्रित करतात. विलास सारंग सोलेदाद मध्ये २१ व्या शतकातील माणसाचे एकाकीपण सांगतात तर अनिल डांगे यंत्र, समाज, निसर्ग यांच्यापासून मुक्त होऊ पाहणाऱ्या माणसाचे चित्रण 'एरियल व पोरके पाखरु' मध्ये करतात. ह. मो. मराठे औद्योगिकरणाविषयी लिहितात. ग्रामीण जीवन रा. रं. बोराडे, उद्धव शेळके आणि आनंद यादव सांगतात तर दलित जीवन उत्तम तुपे, सरवा कलाल, भास्कर चंदनशिव सांगतात. देवीदास बागुल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' मध्ये नायकाची जात जेव्हा इतरांना कळते तेव्हा त्याच्या दांभिक वर्तनाचे नाट्यमय चित्रण केले आहे.

सामाजिक भान असणारे आणि सोप्या सरळ भाषेत परिवर्तनाची भाषा करणारे कवी म्हणजे नारायण सुर्वे. यांनी माझे विद्यापीठ आणि जाहीरनामा मध्ये शेतकरी, कामगार यांची दुःखे मांडली आहेत. नामदेव ढसाळ आणि सुर्वे पिडीतांच्या मुक्तीसाठी समग्र क्रांतीचे आव्हान करताना सुर्वे म्हणतात, रोटी प्यारी खरी, आणखी काही हवं आहे! याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवत आहे.

'बलुतं' या दया पवारांच्या आत्मकथनाने दलित आत्मकथनांना गती दिली. यात दया पवारांचे दुःख तर आहेच पण शिवाय इतर पिडीत व्यक्तीचित्रेही आहेत. प्र. ई. सोनेकांबळ्यांचे 'आठवणीतील पक्षी', शरणकुमार लिंबाळ्यांचे 'अक्करमाशी' किशोर शांताबाई काळेचं 'कोल्हाट्याचं पोर', लक्ष्मण मान्यांचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाडांचे 'उचल्या' ही लक्षवेधी आत्मकथने वाचल्यावर जाती विषमतेमुळे हे घडत आहे व सामाजिक परिवर्तनाशिवाय माणसाला माणूस म्हणून तरी किंमत राहील का ? ही शंका मनात उपस्थित होते.

चित्रपट नाट्यक्षेत्रातील आत्मकथने ही आत्मशोध आणि आत्मसमर्थनासाठी लिहिली गेली उदा. मधुकर तोरडमल 'तिसरीघंटा', सी रामचंद्राची 'माझ्या जीवनाची सरगम' 'सांगते ऐका' हंसा वाडकर, 'अशी मी जयश्री गडकर', 'आहे मनोहर तरी', सुनीता देशपांडे इ.

सरते शेवटी परिवर्तन हे समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. परिवर्तनामुळे सांस्कृतिक बदल घडून ललित साहित्य बदलते हे जरी खरे असले तरी काही साहित्य कृती या चिरंतन असतात. कारण त्या शाश्वताचे दर्शन घडवतात त्यामुळे कितीही परिवर्तन घडले तरी त्या अबाधित आणि चिरंतनच राहतात.

---

**सविता प्रभुणे**

स. प. महाविद्यालय - पुणे.

•••

# स्वायत्तता - घटक राज्यांची

*वी. पी. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील आणखी एक भाषण. - संपादक*

'अलब्ध लाभार्थं
लब्धस्य परिरक्षिणी
रक्षितस्य विवार्धिनी
विवार्धितस्य पात्रेषु'

कौटिल्य म्हणतो, राजाने ज्ञान, पैसा आणि सत्ता या गोष्टी मिळवायलाच हव्यात आणि मिळविल्यानंतर त्या टिकवून ठेवायलाच हव्यात. माझ्या मते, घटक राज्यांच्या स्वायत्ततेचं मूळ हे या सूत्रामध्ये आहे. कारण भारतातील केंद्र सरकारने ज्ञानाचं माहीत नाही; मात्र पैसा आणि सत्ता आपल्या हातात अगदी घट्ट धरून ठेवल्या आहेत, दुदैवानं जास्तच ! त्याचं निश्चितच केंद्रीकरण झालं आहे. आणि ही जाणीव राज्यांना झाल्यामुळे (कदाचित्) स्वायत्ततेची मागणी पुढे आली आहे.

या स्वायत्ततेच्या अनुषंगाने काही प्रश्न पुढे येतात, ही मागणी का होते आहे ? स्वायत्ततेचं स्वतंत्रतेत रुपांतर होऊ शकतं का ? समान स्वायत्तता द्यायला हवी का ? यांची उत्तरं स्वायत्ततेच्या अर्थातच आहे 'स्व+आयत्त' 'स्व' म्हणजे स्वतः तर 'आयत्त' म्हणजे अवलंबून असणारा म्हणजेच स्वतःवर अवलंबून स्वयंपूर्ण नाहीत का ? नसल्यामुळे स्वायत्ततेची मागणी करत आहेत का ? असंच काहीसं आहे. स्वायत्ततेचा विचार करताना आपल्याला थोडं मागं जावं लागेल.

१९४७ मध्ये फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली होती. त्याशिवाय नवस्वतंत्र देश म्हणून भारतापुढे आर्थिक आणि सामाजिक समस्याही होत्याच. या सर्वांना तोंड देण्यासाठी म्हणून केंद्र सरकार प्रबळ बनविण्यात आलं, तर राज्यांना त्या मानाने दुय्यम दर्जा देण्यात आला. मात्र आज ५० वर्षांनंतरही ही परिस्थिती बदलली नसल्याचा आरोप राज्यांकडून होत आहे आणि तो खराही आहे. राज्यांना प्रशासकीय आणि आर्थिक विषयांमध्ये स्वायत्तता हवी आहे.

खरं तर भारतीय संविधानात कलम १ मध्ये सांगितल्या प्रमाणे India i.e. Bharat Shall be Union of States म्हणजेच भारत हा 'राज्यांचा संघ' आहे हे स्पष्ट केले आहे. मग राज्यांचा संघ असलेल्या या देशामध्ये राज्यांचं काय स्थान आहे ? तर राज्ये केंद्रावर अवलंबून राहिली आहेत. किंबहुना त्यांना तसं ठेवलं गेलयं. त्यामुळे मग देशातून राज्ये फुटून निघण्याची शक्यता कमी होते. आज भारतातील राज्ये सर्वार्थाने स्वयंपूर्ण नाहीतच. म्हणूनच आज जेव्हा काश्मीरच्या निमित्ताने स्वायत्तेची मागणी पुढे आली. तेव्हा ती काहीतरी भयंकर आपत्तीकारक वाटत आहे.

केंद्र सरकार कसे प्रबळ बनत गेलंय् ते पाहू या. घटनेमध्ये राज्यांनी व केंद्राने करायचे कायदे यांचे ३ सूचींमध्ये विभाजन करण्यात आलं आहे.

१) **केंद्र सूची** - केंद्राने अति महत्त्वाच्या राष्ट्रीय विषयांवर करायचे कायदे.

२) **राज्य सूची** - राज्यांनी त्यांच्या अखत्यारित असलेल्या विषयांवर करायचे कायदे.

३) **समवर्ती सूची** - दोन्ही सूचींमध्ये समाविष्ट न केल्या गेलेल्या विषयांवर राज्य आणि केंद्र या दोघांनाही कायदे करता येतात. मात्र यामध्ये जर केंद्राने आधी कायदा केला तर राज्यांना त्या विषयावर कायदा करता येत नाही. केंद्राने

आपल्या अधिकाराचा गैरवापर करून आपल्या अखत्यारीतील विषय वाढविले असून, राज्यांचे विषय मात्र कमी आहेत. म्हणूनच राज्यांकडून प्रशासकीय गोष्टींमध्ये केंद्राचा अति हस्तक्षेप होत आहे अशी ओरड होते आहे. त्याशिवाय प्रशासकीय स्वायत्ततेत राज्यपालांच्या कार्यपद्धतीचा पुर्नविचार व्हावा असा ही एक मुद्दा आहे. त्यामध्ये राज्यपाल कोणत्याही राजकीय पार्श्वभूमीमधून आलेला नसावा आणि त्याहूनही महत्त्वाचं राष्ट्रपतींकडून राज्यपालाची नेमणूक होताना त्या राज्याच्या मुख्यमंत्र्याचा सल्ला घेतला जावा, अशा मागण्या आहेत. कारण राज्यपाल राज्यांच्या हिताकडे लक्ष देण्याचं सोडून काम करतोय. तर ३५६ व्या कलमाचा गैरवापर करून राज्यावर राष्ट्रपती राजवट लादली जातेय, असं राज्याचं म्हणणं आहे. म्हणूनच राज्यांना प्रशासकीय स्वायत्तता हवी आहे. मात्र अशी स्वायत्तता देताना हा विचार झाला पाहिजे की खरोखर राज्यपालाची नेमणूक मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने व्हावी का ? कारण मग 'पक्ष' पातीपणा होऊ शकतो.

माझ्या मते स्वायत्ततेमध्ये जास्त विचार झाला पाहिजे 'आर्थिक स्वायत्ततेचा' सध्या राज्यांना केंद्राकडून जी मदत मिळते ती राज्याची लोकसंख्या, दारिद्र्य आणि सुविधा यावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे राज्ये काही कर गोळा करतात त्यांचा विनियोग वाटप केंद्राकडून होतो. जी बऱ्याच वेळा राजकीय डावपेचांवर आधारित असल्यामुळे विषम असतं. म्हणूनच राज्यांकडून गोळा केलेल्या करांचा विनियोगही आपल्याकडूनच व्हावा अशी मागणी होते आहे. राज्यांच्या दृष्टीने जरी ही योग्य मागणी असली तरी ती फार मोठी जबाबदारी आहे. कारण मग केंद्राकडून होणारी विषमता जरी कमी होणार असली तरी ही प्रत्येक राज्याला त्याच्या प्रदेशांमधून गोळा होणाऱ्या करांवर व उपलब्ध नैसर्गिक साधन-संपत्तीवरच अवलंबून रहावं लागणार आहे. त्यामुळेच मुळातच जी राज्ये दुबळी, अप्रगत आहेत त्यांचं काय ? असा प्रश्न निर्माण होतो. एक मात्र आहे की, अशा राज्यांना आपल्या प्रगतीसाठी स्वतःहून प्रयत्न करावेच लागतील. म्हणूनच कदाचित् प्रादेशिक असमतोल वाढवण्याच्या भीतीपेक्षाही तो कमी होण्याची शक्यता मला जास्त वाटते. मात्र स्वायत्तता दिल्यानंतर राज्याचं 'बिहार' होणार नाही, अशी खात्री आपल्याला देता येते का ? केंद्राने राज्यांना दिलेल्या स्वायत्ततेचा वापर जबाबदारीने करावा लागेलच, पण केंद्रालाही सर्व राज्यांना एकत्र बांधून ठेवण्याचं, त्यांच्यावर देखरेख करण्याचं आणि अप्रगत राज्यांना वेळप्रसंगी सावरायला मदत करण्याचं कार्य अगदी कुटुंबातल्या आई-वडिलांप्रमाणे करावं लागणार आहे.

स्वायत्तता दिल्यानंतर होणाऱ्या परिणामांमध्ये सगळ्यात जास्त बागुलबुवा केला जातोय तो म्हणजे राज्ये स्वयंपूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रतेकडे वळतील. माझ्या मते ही भीती मात्र व्यर्थ आहे. कारण अशा राज्याचं संरक्षण कोण करणार हा मोठाच प्रश्न आहे आणि इतिहास साक्षी आहे की मोठ्या राज्यांना आक्रमणाची जास्त भीती आहे. त्याशिवाय भारतीय शासन पद्धती पूर्णपणे संघराज्यात्मक नाही आणि म्हणूनच भारतातील घटक राज्यांना रशियाप्रमाणे फुटून निघण्याचा (अगर आपल्या सीमा बदलण्याचा) अधिकार नाही. आणि म्हणूनच राज्ये स्वायत्ततेकडून स्वतंत्रतेकडे वळतील ही शक्यता नाही. महत्त्वाचं म्हणजे आपण राज्यांवर एवढा विश्वास ठेवायलाच हवा अन्यथा त्यांच्या मनात असा संभ्रम निर्माण होऊ शकतो. यासाठीच राज्यांना काही मर्यादेपर्यंत स्वायत्तता देणं योग्य होईल. अन्यथा सध्या मानवी हक्कांचं अवडंबर माजवून अनेक राष्ट्रांचं विभाजन करण्यात जगातील महासत्ता मग्न आहेत. अशा नाजूक परिस्थितीत पुढे आलेल्या स्वायत्तेच्या मागणीचा जर सारासार विचार झाला नाही तर, मात्र भारताचं Balkonization होऊ

शकतं. म्हणूनच 'राज्यांचा संघ' असलेल्या या देशात राज्यांबद्दल सतर्क आणि सकारात्मक विचार होणे आवश्यक आहे.

पण वादाचा मुद्दा राहतो तो सीमेवर असलेल्या राज्यांच्या स्वायत्ततेबाबत. केवळ जम्मू-काश्मीरच नव्हे तर ईशान्येकडील राज्यांचा केंद्रावर नेहमी एक आरोप आहे तो म्हणजे केंद्र त्यांच्याकडे लक्ष देत नाही आणि बऱ्याच अंशी तो खराही आहे. म्हणूनच ही राज्ये त्यांच्या सीमेलगतच्या इतर देशांकडे आकर्षित होत आहेत. यामुळेच भारताच्या अखंडतेला, एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे का असं वाटतं. हा संभ्रम जर काढून टाकायचा असेल तर त्यांना स्वायत्ततेची जास्त गरज आहे असं मला वाटतं. कारण सध्या त्यांना आपणही याच देशाचे 'घटक राज्य' आहोत आणि ती दृढ करणं महत्त्वाचं आहे. मात्र इथेही समान स्वायत्तता द्यायला हवी का ? याचा विचार व्हायला पाहिजे.

पाक माँगे पाकिस्तान
शीख माग तो खालिस्तान
असेच करा देशाचे तुकडे लहान

आणि मग खुशाल म्हणा 'मेरा भारत महान' सध्या भारतात आलेल्या 'स्वतंत्र' राज्य निर्मितीच्या साथीमुळे अशीच परिस्थिती होईल का ? अशी भीती वाटत आहे. माझ्या मते स्वायत्तता अशा स्वतंत्र राज्य निर्मितीवर चांगला उपाय आहे. कारण मग राज्ये त्यांच्या अखत्यारीत असलेल्या अधिकारांचा पुरेपुर वापर करून आपली प्रगती करून घेतील. मात्र इथेही त्या त्या राज्यांच्या राजकीय - प्रशासकीय प्रमुखाच कार्य आणि मुख्य म्हणजे त्यांची राजकीय इच्छाशक्ती यावर बरचं काही अवलंबून राहणार आहे.

सरतेशेवटी स्वायत्ततेच्या वाईट परिणामांचा म्हणजे फुटीरतावाद, प्रादेशिकता, असमतोल यांना मिळणारी चालना याबरोबरच चांगल्या परिणामांचा जास्त विचार झाला पाहिजे असं मला वाटत. ते म्हणजे

१) राज्यांची प्रगती होईल म्हणून भारत देशाची प्रगती होईल.

२) राज्य आणि केंद्र एकाच पातळीवर आल्यामुळे Co-operative Federalism म्हणजे सहकार्यात्मक संघराज्यपद्धती अस्तित्वात येऊ शकते, ज्याची सध्या आपल्याला सगळ्यात जास्त गरज आहे.

याहीपेक्षा महत्त्वाचा परिणाम होऊ शकतो तो आपल्या शासनपद्धतीवर. स्वायत्तता दिल्यावर आपण अमेरिकेच्या जास्त जवळ जाणार आहोत अशी मानसिकता निर्माण होऊन भारतात कदाचित् अध्यक्षीय पद्धतीही अस्तित्वात येऊ शकते.

एकूणच घटक राज्यांच्या स्वायत्ततेचा सर्व दृष्टिकोनांतून विचार झाला तरीही निर्णय मात्र एकच आणि ठाम घेतला पाहिजे. अन्यथा

चीन और अरब हमारा
हिंदुस्तॉ हमारा
रहनेको घर नहीं है
फिर भी सारा जहाँ हमारा।

अशी आपली परिस्थिती होईल.
जय हिंद !

**कु. केतकी सु. लोणकर**
रुम नं. ६६६/१/१, ८, स्टेट बँक नगर,
अप्पर इंदिरा नगर समोर,
बिबवेवाडी, पुणे - ३७.

•••

# प्रदूषणाच्या विळख्यात मानवी आरोग्य

*सरासरी आयुर्मान वाढले, पण माणसं जास्त वर्ष जगणे याला महत्त्व आहे की निरोगी जीवन जगणे याला महत्त्व आहे ? रोगांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या रोगमय जीवनास कारणीभूत आहे प्रदूषण. त्या संबंधीचा हा लेख. - संपादक*

आज आपण एकविसाव्या शतकात पदार्पण केलेले आहे. मानवाचे सरासरी आयुर्मान वाढलेले आहे. त्याला अनेक कारणे आहेत. बालमृत्यूंचे प्रमाण कमी झालेले आहे. वैद्यकीय सुविधा वाढलेल्या आहेत. निरनिराळ्या प्रतिबंधक लसींच्या प्रभावी वापरामुळे साथींच्या रोगांना बऱ्याच प्रमाणात आळा बसलेला आहे. पेनिसिलीन सारख्या परिणामकारक प्रतिजैविकांचा वापरही त्याला बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहे. परंतु मानवाचे आयुर्मान वाढलेले असले तरी आरोग्याचे काय ? तो आज स्वस्थ आणि निरामय जीवन जगतो आहे का ? दीर्घायुषी मनुष्य निरनिराळ्या व्याधींनी ग्रस्त असेल, तर त्याला काय अर्थ ? अगदी अमेरिकेसारख्या विकसित देशांमधील माणसांचे आरोग्य देखील उत्कृष्ट प्रकारचे आहे असे आपल्याला म्हणता येईल का ? क्षयरोगासारख्या दुर्धर रोगांवर त्याने विजय मिळविलेला असला तरी कॅन्सर, एड्स सारखे रोग आहेतच ना ? देवी, प्लेग इ. रोगांचे निर्मूलन झालेले असले तरी उच्च रक्तदाब, मधुमेह इ. व्याधींनी तो पछाडलेला आहेच ना ?

आधुनिक काळात देखील मानवी आरोग्याने अपेक्षित उंची गाठलेली नाही. ह्याचे प्रमुख कारण आहे प्रदूषण ! जणू काही प्रदुषणासुराच्या मगर मिठीत, सापडून मानवी आरोग्य धोक्यात आलेले आहे. अर्ध विकसित आणि विकसनशील देशांमध्ये तर प्रदूषणाचे प्रमाण फारच भयावह असल्यामुळे तेथील जनतेचे आरोग्य धोक्याच्या गंभीर पातळीपर्यंत पोहोचले आहे आणि ह्याला विकसित देशांमधील प्रदूषण पण कारणीभूत आहे.

मानवाला आजकाल हवा, पाणी, अन्न या गोष्टी शुद्ध स्वरूपात मिळतात का ? तिन्ही प्रकारचे प्रदूषण एवढे आहे की या तिन्ही जीवनावश्यक गोष्टी शुद्ध स्वरूपात कशा असतात ह्याची जणू काही तो ओळखच विसरला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकरण, शेतीखाली आणले जाणारे वाढते क्षेत्र, ह्यामुळे वृक्षांची बेसुमार तोड होत आहे. डोंगर उघडे-बोडके होत आहेत. माळराने उजाड होत आहेत. शहरांमध्ये सिमेंट कॉंक्रीटचे जंगल फोफावत आहे. मग मुलांना खेळण्यासाठी मैदाने कुठून शिल्लक राहणार ? बागा ही शहराची फुफ्फुसे आहेत असे केवळ म्हणावेसे वाटते. पण किती शहरांमध्ये शहरवासियांना मोकळा श्वास घेता येईल अशा पुरेशा बागा आहेत ? वाहनांचे प्रमाण बेसुमार वाढले आहे. कारखान्यांची धुरांडी आणि चिमण्या अहोरात्र धूर, काजळी आणि अपायकारक वायू ओकताहेत. यातूनच श्वसन संस्थेचे विकार उद्भवतात. आणि मानवी आरोग्याला धोका पोहचतो. एखादी भोपाळसारखी वायु-दुर्घटना घडली की आपण खडबडून जागे होतो. एरव्ही नाही. वातानुकुलित यंत्रणा आणि रेफ्रिजिरेटर मधून वापरले जाणारे क्लोरोफ्लोरो कार्बन सारखे वायु ओझोनच्या संरक्षक थराला भगदाड पाडताहेत, याची गंभीर दखल आपण कधी घेणार आहोत ? नुसत्या विकासाच्या नावाखाली मानवी आरोग्याला हानी पोहोचली आणि परिणामी मानवी आरोग्य धोक्यात आले, तर त्याला जबाबदार आपणच नाही का ?

हवेच्या प्रदूषणानंतर गंभीर समस्या आहे, ती जलप्रदूषणाची. प्रत्येक मानवाला पुरेसे, शुद्ध, पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. ही त्याची मूलभूत गरज आहे. आणि तो त्याचा हक्कही आहे. भारतासारख्या देशामध्ये शुद्ध तर सोडाच पण पुरेसे पिण्याचे पाणी मिळत नाही एवढी परिस्थिती भयावह आहे. ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. अजूनही बऱ्याच गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. पिण्याचे पाणी आणण्यासाठी विशेषतः महिलांना कित्येक किलोमीटर्सची पायपीट करावी लागते. उन्हातान्हातून वणवण करावी लागते. आणि एवढे

करूनही जे पाणी मिळते ते पिण्यालायक असते का ? औद्योगिक कारखाने, त्यांचे सांडपाणी, नद्यानाले ह्यात सोडून ते पाणी दूषित करत आहेत. आपल्या देशामध्ये येणारे परदेशी प्रवासी येताना स्वतःबरोबर पिण्याचे पाणी घेऊन येतात. त्यांचे म्हणणे आपल्या भारत देशामध्ये पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. ह्यातूनच शहाण्या माणसाने काय तो बोध घ्यावा. 'गंगा' मैय्या, तेरा पानी अमृत' असे आपण एके काळी अभिमानाने म्हणत होतो. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. 'राम तेरी गंगा मैली' असे म्हणण्याची आज आपल्यावर वेळ आलेली आहे. या दूषित पाण्यामुळेच मध्यंतरी डोंबिवली शहरामध्ये 'डोंबिवली फीव्हर' याच नावाने ओळखल्या जाणाऱ्या तापाची साथ पसरली होती. हे चित्र भयावह नाही का ?

त्यानंतर अन्नप्रदूषणाची समस्या आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांना दोन वेळ पुरेसे अन्न मिळत नाही. मेळघाटासारखा आदिवासी विभागामध्ये कुपोषणामुळे आणि उपासमारीमुळे बालके मृत्यूमुखी पडत आहेत. त्यांना दोन वेळ पुरेसे अन्न मिळते, ते सकस आणि आरोग्यसंपन्न असते का ? हा पुढचा प्रश्न आहे. रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वापर ह्यामुळे अन्न प्रदुषित होत आहे. दूध, भाज्या, फळ-फळावळ, मासे या गोष्टी शुद्ध स्वरुपात मिळत नाहीत. कमी उत्पन्न गटातील जनतेला आर्थिक परिस्थितीमुळे दूध, अंडी, मांस, फळे, मासे इ. पौष्टिक पदार्थ विकत घेणे परवडत नाही. त्यामुळे ग्रामीण विभागामध्ये निस्तेज चेहऱ्याची कुपोषित मुले दृष्टीस पडताहेत. हे चित्र आशावादी आणि उत्साहवर्धक आहे का ?

त्यानंतरची समस्या आहे ध्वनि प्रदूषणाची. आपल्याकडे ध्वनीचे देखील प्रदुषण असते आणि त्याचा मानवी आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतो. ह्याची जाणीवच नाही. त्यामुळे बारसे असो की बारावे, लाऊडस्पीकर वरुन मोठमोठ्याने कर्कश आवाजात भेसूर आणि बेसूर गाणी लावली जातात. शेजारी आजारी व्यक्ती असेल याची दखल न घेता. रेडिओ, टी. व्ही, टेपरेकॉर्डर कोकलत असतात. हॉस्पिटल सारख्या ठिकाणी No Horn सारखे फलक लावलेले असतात. त्यांना न जुमानता चित्रविचित्र, भयानक आवाजात वाहनचालक हॉर्न वाजवत असतात. मुंबई, दिल्ली, कोलकता आणि चेन्नई ह्या महानगरातले ध्वनी प्रदूषण धोक्याच्या पायरीच्या केव्हाच पुढे गेलेले आहे. आणि ध्वनी प्रदूषणाचा परिणाम होऊन आजकाल जशी चष्मा लावणारी लहान मुले दिसतात, तशी काही वर्षांनी श्रवणयंत्रे लावणारी मुले दिसतील की काय अशी सार्थ भीती वाटते.

त्यानंतर सर्वात महत्त्वाचे प्रदुषण आहे, ते किरणोत्सारी प्रदूषणाचे. त्याचे भयंकर परिणाम अखिल मानवजातीने दुसऱ्या महायुद्धाचा शेवट करण्यासाठी अमेरिकेने जेव्हा जपान हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अणुबॉंब टाकले, त्यावेळीच अनुभवले आहे. लाखो माणसे मेली, लाखो अपंग झाली, इतकेच नव्हे तर त्यानंतर जन्माला आलेली बालके काही ना काही व्यंग घेऊन जन्माला झाली. आणि अधूनमधून चर्नोबिल सारख्या दुर्घटना घडत असतात. तरीही आपले डोळे उघडत नाहीत. अण्वस्त्रांची स्पर्धा वाढलेली आहे. भारत आणि पाकिस्तान सारखे देशही अणुस्फोट घडवून आणत आहेत. अणुचाचण्या घेत आहेत. पण यातून मानवी आरोग्याचे भवितव्य काय ? त्याला धोका पोहोचत नाही का ? शांततेसाठी अणुऊर्जेचा वापर करायचा झाला तरी तो कितपत सुरक्षित आहे ? तारपूर सारख्या अणुविद्युत प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या डोक्यावर किरणोत्सर्गामुळे कॅन्सर होण्याच्या भीतीची टांगती तलवार असतेच ना ?

सारांश एकविसाव्या शतकामध्ये मानवी आरोग्याची स्थिती चिंताजनक आहे. आणि त्याला कारण मानवनिर्मित प्रदूषण हेच आहे. आणि ह्या प्रदूषणाला आळा घालण्यात मानवजात यशस्वी झाली तरच ती स्वस्थ आणि निरोगी मानवी आरोग्याचे स्वप्न पाहू शकेल.

**श्री. प्रभाकर अरदकर**
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

# पक्ष्यांचा अभ्यास काही विचार

*पक्षी निरीक्षण हा एक महत्त्वाचा छंद. या छंदाविषयी व पक्ष्यांविषयी माहिती देणारा हा लेख - संपादक*

माणसांचा व पक्ष्यांचा संबंध पुरातन काळापासून आहे. पुराणात अनेक मानवी आणि पक्ष्यांच्या संबंधाच्या कथा वाचावयास मिळतात. 'जटायुची कथा', 'गरुडाची कथा' अशा कितीतरी कथा अजूनही आपण वाचतो, ऐकतो.

प्राचीन काळी माणसाने पक्ष्यांचे महत्त्व ओळखले होते. म्हणूनच पक्ष्यांना देवत्व दिले. निरनिराळ्या देवांचे वाहन म्हणून पक्ष्यांना स्थान मिळाले. माणसांचे आणि पक्ष्यांचे नाते अनन्य साधारण आहे. मानवाशिवाय पक्षी जीवन टिकू शकतात पण पक्ष्यांशिवाय मानवी जीवनच अशक्य आहे, इतके पक्ष्यांच्या जीवनावर मानवांचे जीवन अवलंबून आहे. त्यासाठी पक्ष्यांचा अभ्यास करणे अगत्याचे आहे. पक्ष्यांचे विविध आकार, रंग, राहण्याची ठिकाणे सारे काही मनाला वेड लावणारे आहे. पक्षी म्हणजे निसर्गाला पडलेले सुंदर स्वप्नच !

पण आता स्वप्नच उध्वस्त होण्याच्या मार्गाला लागले आहे. माणसाने आपल्या स्वार्थासाठी अखंड पक्षी जीवन उध्वस्त करण्यास प्रारंभ केला आहे. खाण्यासाठी, पिसांसाठी, व्यापारासाठी पक्ष्यांचा नाश होत आहे. पक्षी खरं तर शेतकऱ्यांचा मित्र आहे. धान्याने भरलेल्या शेतात पक्षी प्रामुख्याने धान्यावर असलेली कीड खातात. त्यायोगे धान्याचे संरक्षण होते. गिधाडासारखे पक्षी मृत शरीरावर जगतात पर्यायाने निसर्गाची स्वच्छता करतात. त्यांना सफाई कामगारच म्हणायला हवे.

येणाऱ्या पिढीला पक्ष्यांचे महत्त्व पटवून देणं महत्त्वाचे आहे. वेळीच हे संस्कार होणे आवश्यक आहे. मोठ्या सुट्टीत पक्षी निरीक्षण करावे. शाळा महाविद्यालयात पक्षांची माहिती देणारी भित्तीचित्रे, चित्र प्रदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करावे. पक्षी निरीक्षण, हा आजचा अभ्यास नाही. पक्षी निरीक्षणांच्या अभ्यासाचा इतिहास मनोरंजक तर आहेच शिवाय ती एक शास्त्रीय पद्धती बनली आहे.

पक्षी निरीक्षणात मान्यवरांनी केलेले योगदान महत्त्वाचे आहे. त्यांचे लेखन अभ्यासनीय आहे. शिवाय मार्गदर्शक आहे. पक्ष्यांचा अभ्यास करणे हे आता एक स्वतंत्र तंत्र बनले आहे. भारतामध्ये पक्ष्यांचा अभ्यास प्रामुख्याने इंग्रजांच्या आगमनानंतर झाला. यापूर्वी जरी पक्ष्यांचा अभ्यास झाला असला तरी तो अभ्यास दंतकथा स्वरुपात मोठ्या प्रमाणात दिसतो. त्याला शास्त्रीय आधार नव्हता. कोणत्याही विषयाचा शास्त्रीय अभ्यास करताना वर्गीकरण करणे सोयीस्कर ठरते. प्राण्यांच्या वर्गीकरणात सूत्रबद्धता आणण्याचा पहिला प्रयत्न ॲरिस्टॉटलने केला. १८ व्या शतकातील निसर्ग तज्ञ लिनिअस ह्या स्विस शास्त्रज्ञाने वर्गीकरणाची पद्धत घालून पुढचा टप्पा गाठला. वाद आणि रचना यामधील मूलभूत फरकावर आधारित अशा २७ गटांमध्ये पक्षीवर्गाचे वर्गीकरण केले जाते. उदा. कुलिंग गणातील पक्षी म्हणजे झाडावर राहणारे पक्षी, पाण्याजवळ राहणारे बक गणातील पक्षी. सध्या पृथ्वीवर ८६५० जाती आहेत. त्या २७ गटांमध्ये विभागलेल्या आहेत. त्या गटांची अनुक्रमे सर्वात कमी प्रगत अशा बंजुळ आणि मंजूळ पक्षापासून सुरु होऊन अतिशय प्रगत अशा फांदीधरी पक्ष्यांपर्यंत शेवट होतो.

भारतातील १२०० पक्ष्यांच्या जाती ७५ कुलांचे आणि २० गटांचे प्रतिनिधित्व करतात. पक्ष्यांची ही संख्या मोठी आहे. आपल्या देशात इतक्या मोठ्या प्रमाणात हे पक्षी आढळण्याचे कारण म्हणजे आसेतु हिमालय पसरलेल्या प्रदेशातील हवामान आणि भौगोलिक परिस्थितीतिल विविधता हे होय.

आपल्या देशात पक्षी विज्ञानाचा पाया १८६२ व १८६४ या काळात टी. सी. जेरडॉन यांनी घातला. भारतीय पक्ष्यांबाबत त्यांचे पुस्तक याच काळात प्रसिद्ध झाले. डॉ. जेरडॉन हे सैन्यातील शस्त्र वैद्य होते. नोकरीच्या निमित्ताने भारतात वेगवेगळ्या भागात वास्तव्य केले होते. या काळात पक्षी गोळा करून त्यांचा अभ्यास केला. दुर्बिणीच्या आणि कॅमेऱ्याच्या शोधापर्यंत पक्ष्यांना मारूनच त्यांचा अभ्यास केला जात असे. त्याचप्रमाणे पक्षी निरीक्षण हा काही शास्त्रीय मूल्ये असणारा विषय नव्हता. मात्र जेरडॉनच्या पुस्तकामुळे पक्षी निरीक्षणाला नवा अर्थ प्राप्त झाला. नॅशनल काँग्रेसचे संस्थापक ॲलन ऑक्टव्हियन ह्यूम ह्या ब्रिटिश अधिकाऱ्याने भारतीय पक्ष्याच्या अभ्यास विकासात महत्त्वाचा टप्पा निर्माण केला. ह्यूम ब्रिटीश अधिकारी असले तरी ते श्रेष्ठ पक्षी तज्ञ होते. पक्षी प्रेमी लोकांना पक्षांचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन ते करीत असत. 'स्ट्रे फेदर्स' नावाचे नियतकालिक त्यांनी प्रसिद्ध केले. १८७२ ते १८८८ ह्या सोळा वर्षांच्या काळात 'स्ट्रे फेदर्सचे' अकरा भाग प्रसिद्ध झाले त्यामुळे आपल्या भारतीय पक्षी विज्ञानाचा पाय घातला गेला. १८८९ आणि १८९८ या काळात इंडिया ऑफीसने इ. डब्ल्यू ओटस आणि डब्ल्यू टी. ब्लॅन फोर्ड ह्या संपादित केलेल्या 'फॉना ऑफ ब्रिटीश इंडिया' या ग्रंथाचे चार भाग प्रसिद्ध केले. 'स्ट्रे फेदर्स' ह्या मासिकाचे प्रकाशन बंद झाल्यावर 'जर्नल ऑफ दि बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी' ह्या नियतकालिकात पक्ष्यांची माहिती प्रसिद्ध होऊ लगली.

पक्षी मारून त्याचा अभ्यास करणे हे मूलतः अनैसर्गिक अमानवी आहे हा विचार आता मूळ धरू लागला आहे. नवनव्या शोधामुळे पक्षी निसर्गावस्थेत पहाणे, अभ्यासणे सुलभ होऊ लागले आहे. संग्रहालयातील मृत पक्षी अभ्यासण्यापेक्षा निसर्गातील जिवंत पक्षी अभ्यासणे अधिक श्रेयस्कर मानले जाते. पक्ष्यांची जीवन कथा, त्यांचे संस्कार , समायोजन क्षमता, हा सर्व अभ्यास करण्यासाठी अभ्यासकांच्या अंगी चिवटपणा असणे अगत्याचे आहे.

पक्षी निरीक्षण हे अलिकडे एक तंत्र बनले आहे. या तंत्राचा योग्य पद्धतीने वापर केला पाहिजे. अनेकदा फॅशन म्हणून पक्षी निरीक्षणास लोक जातात. पक्ष्यांचा आणि एकंदर प्राणी जीवनाचा अभ्यास कसा करावा हे न उमगल्याचे पक्षी आणि प्राणी जीवनाची हानीच होते. म्हणून पक्षी निरीक्षणाचे तंत्र समजावून घेतले पाहिजे.

पक्षी निरीक्षणासाठी तीन गोष्टींची गरज आहे. १) दुर्बिण २) नोंदवही ३) संदर्भग्रंथ. दुर्बिणीचा विचार करताना ८ x ३० किंवा ७ x ५० ची दुर्बिण योग्य ठरते. ती बोजड असता कामा नये. सहजगत्या तिचा वापर करता आला पाहिजे तिची वर्धनशीलता भरपूर असावी. अभ्यासकाला परिसरातील पक्षी ओळखता यावेत ही किमान अपेक्षा आहे. या संदर्भात 'पॉप्युलर हॅंडबुक ऑफ इंडियन बर्डस्' आणि सलीम अलींचे 'द बुक ऑफ इंडियन बर्डस्' अशी पुस्तके उपयोगी पडतात. पक्षी निरीक्षणात संदर्भ ग्रंथ असणे त्याप्रमाणे वेळच्या वेळी निरीक्षणे नोंदवणे महत्त्वाचे ठरते. कारण बऱ्याच वेळा आपली स्मरणशक्ती आपणास दगा देते. ज्या त्या बाबी निरीक्षणात आल्या असतील त्या सर्वांची नोंद होणे आवश्यक ठरते.

पक्षी निरीक्षण हे अत्यंत जिकिरीचे तितकेच आनंदाचे काम आहे. अभ्यासकाच्या चिकाटीची आणि चिवटपणाची परीक्षाच होते हे मान्य करूनही ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. पक्षी निरीक्षकाला नव्या पक्ष्याचा शोध लागला नाही तरी एखाद्या पक्षाची ओळख झाली तरी हा छंद आयुष्यभर लागतो. निरीक्षण आणि शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला तर निसर्गात होणारे बदल आणि त्यांचा अभ्यास करणे सुलभ होते. निसर्गातील घटनांचे पूर्वानुमान काढणे सोपे जाते.

पक्षी पर्यावरणाचे खरे सोबती आहेत. पक्ष्यांच्या जीवनावरच पर्यावरणाचा समतोल अवलंबून आहे. पक्षांचे संरक्षण आणि अभ्यास वाढणे गरजेचे आहे.

---

**सौ. स्वाती जोशी**, माजी विद्यार्थीनी
घोडबंदर रोड, ठाणे.

•••

# समिधा-एक वाचनीय आत्मकथन

चरित्र, आत्मचरित्र किंवा आत्मकथन हा एक महत्वाचा साहित्य प्रकार (Form of Literature) मानला गेलेला आहे. वास्तविक साहित्य प्रकार म्हटल्यानंतर काही निकष किंवा नियम यांच्या चौकटीत विचार होणे अपेक्षित असते, परंतु या साहित्य प्रकाराबाबत बऱ्याच चौकटी शिथिल कराव्या लागतात. याचे साधे कारण म्हणजे हा व्यक्तीसापेक्ष अनुभवांच्या त्या व्यक्तींच्या दृष्टीकोनातून होणारा अविष्कार असतो. आयुष्य जगताना कधी तरी आपण काय जगलो, कशा प्रकारे जगलो हे तपासून त्यावर भाष्य करण्याची एक नैसर्गिक उर्मी माणसात असते या उर्मीतूनच आत्मचरित्रे किंवा आत्मकथने यांची निर्मिती होणे आत्मचरित्र असामान्यानीच लिहावे, सामान्यांनी लिहू नये असा कोणता दंडक नसल्याने सामान्य माणसेही त्यांच्या अनुभवांचे प्रकटीकरण करत मात्र असामान्याच्या जीवनामधील नाट्यमय प्रसंग, संघर्ष, सामाजिक जीवनाच्या संदर्भात त्यांच्या निर्णय क्षमतांची वारंवार घेतली जाणारी कसोटी या सर्वज्ञात संदर्भांमुळे अशा व्यक्तींची आत्मचरित्रे स्फूर्तिदायक ठरुन शकतात. वाचकाला जीवनाचे स्वरूप अधिक व्यापक अर्थाने कळते व त्यातून त्याला प्रगल्भता लाभू शकते त्यामळे चारचौघांपेक्षा वेगळी वाट चालणारांनी आपले अनुभव लिहून ठेवणे, सांगणे हे महत्वाचे असते.

मराठीत स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे हा मराठी समाजाच्या स्थिती, गतीचा इतिहास आहे. समाजात स्त्री शिक्षणाचा वाढता प्रसार या पार्श्वभूमीवर व्यक्ती म्हणून जगताना स्त्रीला आलेले अनुभव विशेषत: सहजीवनाच्या व विविध नातेसंबंधाच्या संदर्भात, तिच्या जीवनाविषयीच्या जाणीवा या अशा आत्मचरित्रांतून इतक्या स्पष्टपणे व्यक्त झाल्या आहेत की महाराष्ट्राच्या गेल्या शंभर वर्षातील इतिहास आणि प्रगती मोजून पहाणे या आत्मचरित्रांमुळे शक्य होईल. जीवनाच्या एखाद्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या स्त्री ची व्यक्ती म्हणून असणारी भूमिका आणि नातेसंबंधाच्या संदर्भात तिच्या व्यक्तिमत्वावर उमटणाऱ्या ओरखड्यांचे वास्तव यातून समाजाचे, त्या विशिष्ट क्षेत्राचे वेगळे दर्शन घडू शकते. जोडीदार व त्याच्या भाव विश्वाशी स्वभावत:च एकरूप होणारी स्त्री असा संदर्भ येतो तेव्हा अनेक पद्धतींनी लिहिलेली आत्मकथने डोळ्यासमोर येतात.

या पार्श्वभूमीवर बाबा आमटे व साधनाताईंच्या जीवनाचे कथन असणारे समिधा हे आत्मकथन लक्षात घेणे महत्वाचे आहे. हे आत्मकथन फक्त साधनाताईंचे नाही तर बाबांच्या समवेत जगलेल्या अनुभवाचे हे कथन आहे. त्यामुळे असामान्य कर्तृत्वाच्या पुरुषाची पत्नी हे अनुभव सांगत आहे. हा संदर्भ पुस्तक वाचताना मनाला सतत कार्यरत असतो. समाजसेवेच असाधारण क्रम स्वीकारलेल्या बाबासारख्या व्यक्तीमत्वाच्या ध्येयाला आपले अस्तित्व, ईच्छा आकांक्षा एकजीव करायच्या हे त्यामुळेच पदरात निखारे बांधून चालण्यासारखे आहे.

महारोग्यांकरिता वरोडा येथे चालू केलेला आनंदवन आश्रम, तेथील सेवा कार्यातून हजारो महारोग्याचे केलेले पुनर्वसन, सोमनाथचा शेती प्रकल्प, हेमलकसा येथील आदिवासी विकास प्रकल्प आणि अलीकडील काळात नर्मदा आंदोलनासाठी केलेले काम या बाबांच्या लौकिक जीवनातील कार्याच्या दरम्यान असंख्य माणसे त्यांना भेटली, असंख्यांचे असंख्य प्रश्न त्यांनी आपले मानून सोडवले. या जीवन प्रवाहात आपली प्रमाणे त्यांच्या सह या सर्व अनुभवांत साधनाताई सहभागी झालेल्या आहेत त्यामुळे गेल्या पन्नास साठ वर्षातील समाजसेवेचा इतिहास या आत्मकथनातून समोर येतो. या

इतिहासातील एक निरंतर सत्य म्हणजे बाबा आमटे संकटे अंगावर ओढवून घेत जगले. दारिद्रयाचे समूहजीवन त्यांनी आपले मानले.

आत्मकथनाचा एक महत्त्वाचा निकष म्हणजे ते प्रामाणिक, नितळ असायला हवे. कोणतीही 'पोझ' घेून ते लिहिलेले नसावे. त्यातील अनुभव जाणून घेताना हे 'कथन' आपण ऐकत आहोत. असा भास मनात निर्माण होऊन वाचकाला एका व्यापक प्रगल्भतेची प्रचिती त्यातून व्हायला हवी हा एक महत्त्वाचा निकष मानला तर या निकषानुसार समिधा हे फार महत्त्वाचे आत्मकथन ठरते. या आत्मकथनाचे शद्बांकन सीताकांत प्रभू यांनी केले आहे हे पुस्तकात नमूद केले आहे म्हणून मान्य करायला हवे कारण शद्बांकनाला कोठेही मूळ आशय व त्याची अभिव्यक्ती यांच्यात कमतरता निर्माण झालेली नाही. राम शेवाळकरांची छोटी प्रस्तावना या पुस्तकात आहे. ही प्रस्तावना म्हणजे या सहजीवनाचे एक मोठेच विशेषण आहे. अनेक विशेषणांनी भरलेली व भारलेली आहे.


यातील प्रसंगवर्णनात आलेली चित्रमयता, चित्रदर्शी शैलीचा आढळ, नाट्यमयता या संदर्भात देता येतील अशी उदाहरणे पानोपानी विखुरलेली आहेत. श्री. प्रकाश आमटे यांच्या जन्माच्या आधीच्या संदर्भातील हा एक प्रसंग उदाहरणादाखल पाहता येईल. साधनाताई टॉयफॉईडच्या तापाने आजारी होत्या. बाबा मागे लागत म्हणून लोणच्याची बरणी फळीवरुन काढताना त्या पडल्या. त्यानंतर झालेली धावपळ बाबांच्या मनात आलेले विचार यातून प्रभावी शैलीचा प्रत्यय येतो. पु. ल. देशपांडे व सुनिता बाई यांना व्याघ्रदर्शन घडविण्यासाठी वाघोबाच्या जंगलात झालेल्या फेरीच्या प्रसंगाचे उदाहरण ही पाहण्यासारखे आहे. आनंदवनात सतत येत असणारे देशी परदेशी, लहानमोठे पाहुणे त्यांच्या भेटीच्या प्रसंगातील आठवणी, आदिवासींच्या सहवासातील आठवणी अशा कितीतरी संदर्भात आत्मकथनात आलेली नाट्यमयता, संघर्ष याचा होणारा आढळ हे या आत्मकथनाचे विशेष आहेत.

पती-पत्नींच्या सहवासातील केंद्रबिंदू असणाऱ्या या आत्मकथनात दोघांचेही व्यक्तीमत्त्व, त्या व्यक्तीमत्त्वांना असणारे सामाजिक संदर्भ, दारिद्रयाचे समूहजीवन जगताना कार्यकर्त्या पतीबरोबर, संकटे अंगावर घेत झालेली ही वाटचाल आहे. अशा वेळी एकमेकांच्या व्यक्तीमत्त्वाचा मान राखला गेला तरच वाटचाल समृद्ध होते या दृष्टीने शेवटच्या पानावरील साधनाताईंचे एक वाक्य फार सुंदर आहे. या वाक्यातील आशय पुस्तकात जागोजागी व्यक्त होतो. ''वर्षानुवर्षे बाबाच्या पाऊलखुणांत आपले व्यक्तीमत्त्व विलीन केले. आज मात्र बाबांनी माझ्या प्रेमाखातर स्वत्व आणि सत्त्वावर सहजपणे तिलांजली सोडून सर्वांनाच सिमीत केले.'' हे वाक्य ज्या संदर्भात येते तो संदर्भ-नर्मदेपासून विभक्त होण्याचा-देखील मन जड करणारा आहे.

भाषेचा ओघ, अनुभव व्यक्त करण्यातील नितळ प्रामाणिकपणा, समृद्ध जीवन हे सर्व विशेष लक्षात घेता अलीकडे मराठीत आलेल्या आत्मकथनात, विशेषतः स्त्रियांच्या आत्मकथनात हे लक्षणीय आत्मकथन आहे.

प्रा. मोहन पाठक

•••



# तंत्रनिकेतनातील एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ - शब्दकोश

*विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्थांची ग्रंथालये व त्यातील महत्त्वपूर्ण ग्रंथ हा स्वतंत्र विषय आहे. तंत्र निकेतनातील असाच एक महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ याचा परिचय. - संपादक*

McGraw-Hill Dictionary of Scientific & Technical Terms 5th Edition.

"Dictionary of Scientific & Technical Terms" म्हणजे वैज्ञानिक आणि तांत्रिक शब्दांचा शब्दकोश. ही इंग्रजी आवृत्ती आहे. या शब्दकोशात एकंदर २१९४ पाने आहेत. हा शब्दकोश अनेक संपादकांनी संपादित केलेला असून सायबील पारकर हे मुख्य संपादक आहेत. आंतरराष्ट्रीय McGraw-Hill या बुक कंपनीने हा शब्दकोश प्रकाशित केलेला आहे. या शब्दकोशाची पाने पांढऱ्या शुभ्र रंगाची आहेत. त्यामुळे त्यावरील छपाई उठावदार दिसते. याची बांधणी मजबूत पुठ्ठ्यांनी केलेली आहे. पानांची जाडी पातळ असल्यामुळे दोन हजारांवरील पानांचा हा शब्दकोश महाकाय वाटत नाही.

या शब्दकोशाच्या सुरुवातीला शब्दकोशाची प्रस्तावना, शब्दकोशाच्या सहसंपादकांची नावे आणि इतर माहिती दिलेली आहे. तसेच शब्दकोश कसा वापरावा याबद्दल विशेष माहिती दिलेली आहे. या शब्दकोशात आलेली शब्दांची संक्षिप्त रूपे चांगल्या प्रकारे दिलेली आहेत. उदा. AGR म्हणजे Agricultur, Biochem म्हणजे Biochemistry आणि INV Zoo म्हणजे Invertable Zoology. शब्दकोशात शब्द वाचताना कसा उच्चारावा कसा वाचावा याबद्दल माहिती दिलेली आहे. उदा. Mark हा शब्द मार्क असा न उच्चारता Makk (माक्) असा उच्चारावा. या शब्दकोशाची रचना इंग्रजी वर्णानुक्रमानुसार केलेली आहे.

उदा. Air earth current
Air enjector
Air Field
Air Filter
AKF diagram इत्यादी.

काही शब्दांच्या एकापेक्षा जास्त म्हणजे दोन तीन व्याख्या दिलेल्या आहेत. तसेच काही शब्दांचे Cross References दिलेले आहेत.

उदा. Aesthacyte see esthacyte.
ASROL see Antisubmaine Rocket
At wt see atomic weight
Au see gold

काही रासायनिक पदार्थांची रासायनिक सूत्रे दिलेली आहेत.

उदा. Acrqlic Acid ($CH_2CHCOOH$)


या शब्दकोशात शब्दांची माहिती व्हावी म्हणून रेखीव आराखडे, तसेच प्राण्यांची, वस्तूंची, झाडाफुलांची चित्रे दिलेली आहेत. चित्रांवरून आणि रेखीव आराखड्यावरून आपल्याला त्या गोष्टींची कल्पना येते. शब्दकोशातील चित्रांसाठी आकृत्यांसाठी समोरच्या पानाच्या डाव्या बाजूला आणि मागच्या पानाच्या उजव्या बाजूला स्वतंत्र जागा सोडलेली आहे.

यात काही शब्दांचे सुटसुटीत अर्थ दिलेले आहेत.

उदा. Acoustics म्हणजे -
1) The Science of the prodution, transmission & effect of sound आणि 2) The charectoristics of a room that determine the qualities of sound

in it relevent to hearing.
शब्दकोशात आलेल्या काही रासायनिक पदार्थांचे आकृतीबंध दिलेले आहेत.

उदा. Acridine




हा शब्दकोश हाताळण्यास सुलभ आणि सोयिस्कर आहे. कारण याची रचना Alphabetical आहे.

तंत्रनिकेतनातील अभियांत्रिकी महाविद्यालय आणि विज्ञान शाखेतील पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा शब्दकोश उपयुक्त आहे.

---

Title - McGraw -Hill Dictionary of scientific & Technical Terms 5th edition.


Chief Editor - Sybil P. Parkar

Publisher - McGraw -Hill Publishing Co.

**Price Rs.** 5475/-

**सा. ना. बोरसे**
वि. प्र. म. तंत्रनिकेतन, ठाणे.

•••



॥ श्री ॥



प्रा. मोहन पाठक,

स. न. आजच घरच्या पत्त्यावर 'दिशा' चा अंक प्राप्त झाला. मा. कुलगुरु अशोक प्रधान सरांचा लेख अत्यंत योग्य वेळी आला. या अंकातील सर्वच लेख अत्यंत वाचनीय आहेत. दिशाच्या सर्व अंकांची सूची तयार केली ही अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. वाचकांबरोबर ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना आदर्श नमुना म्हणून ही सूची उपयुक्त ठरेल. ३० ते ४० पृष्ठांचे मासिक चालविणे ही अत्यंत आव्हानात्मक जबाबदारी कार्यकारी संपादक म्हणून तुमच्यावर आहे.

आपल्या या उपक्रमास शुभेच्छा.

**प्रा. मधुकर शेवाळे**
साहाय्यक ग्रंथालय,
यशवंत चव्हाण म. मुक्त विद्यापीठ,
नाशिक.

•••

# परिसर वार्ता

१६/१७ फेब्रुवारी २००२ रोजी विद्या प्रसारक मंडळ शैक्षणिक निधीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमातून प्राप्त झालेला निधी मध्यवर्ती वाचनालय व इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज चे अद्ययावतीकरण यासाठी वापरला जाण्याचे विचाराधीन आहे, असे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. वा. ना. बेडेकर यांनी प्रास्ताविकात सांगितले.

दि. १६ फेब्रु. २००२ रोजी श्रीमती देवकी पंडित यांचे शास्त्रीय गायन झाले. आपल्या शास्त्रीय गायनाच्या कार्यक्रमात त्यांनी सुरुवातीला शामकल्याण (जियो मोरे लाल) मग श्री राग व तराणा, नंतर मीराबाईंचे भजन म्हटले. मध्यंतरा नंतर राग रागेश्री (पलक न लागी-विलंबित लय, मोरा मन बस कर लियो-द्रुत लय ) राग सोहनी व शेवट सर्वात्मका सर्वेश्वर या गाण्याने केला. त्यांना तबल्याची साथ महेश कानोले यांनी केली तर संवादिनी वर श्री. सुधीर नायक हे होते. उत्तम साथ, उत्तम आवाज यामुळे अतिशय सुंदर, अविस्मरणीय असा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सुरुवात ठाण्यातील श्री. शैलेश भागवत यांच्या सनईवादनाने झाली. त्यांचे सनईवादनाचे शिक्षण औरंगाबादकर (कौपिनेश्वर मंदिराचे सनईवादक) व उस्ताद बिस्मिल्लाखाँ साहेबांकडे झाले. मध्यंतरी पं. मारुती पाटील यांजकडे ते गायन ही शिकले. त्यामुळे त्यांची कला वाढतच गेली. अनेक मान सन्मान त्यांना प्राप्त झाले. नुकतीच भारत सरकारकडून त्यांना शहनाई हिंदुस्थानी म्युझिक क्षेत्रातील फेलोशिप प्राप्त झाली.

आपल्या कार्यक्रमात त्यांनी पूरिया धनाश्री व धून सादर केली. त्यांच्याबरोबर हार्मोनियमची साथ श्री. श्रीनिवास आचार्य,तबल्याची साथ पं. विभव नागेशकर व सूर सनई आणि सनई साथ श्री. शीतला प्रसाद, श्री प्रेमशंकर व श्री. विजयशंकर यांनी केली.

पं. मारुती पाटील यांनी पं. अरविंद पारीख यांजकडून सतारीचे शिक्षण घेतले. सुरुवातीला आपल्या वडिलांकडून धडे घेतले. या वाद्याच्या माध्यमातून त्यांनी हिंदुस्तानी संगीत परंपरा परदेशात पोचवली. सतारीच्या मार्गदर्शनासाठी परदेशातील संगीत विद्यापीठांकडून त्यांना वेळोवेळी आमंत्रित करण्यात येते. त्यांना तबल्याची साथ पं. विभव नागेशकर यांनी केली.

मध्यंतरा नंतरचा सतार सनईचा जुगलबंदीचा कार्यक्रम विशेष रंगला.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) :**

जपान कराटे असो ने गोवा येथे दि. २ व ३ फेब्रु. २००२ रोजी ८व्या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. स्नेहल गणपत पेंडुरकर (९ब) हिला कटा प्रकारात ३ सुवर्ण, कुमिते प्रकारात १ रौप्य व कास्य पदक प्राप्त झाले.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) चे कलाप्रदर्शन**

डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) चे वार्षिक कलाप्रदर्शन शाळेच्या कलादालनात दि. १३ फेब्रु. २००२ रोजी सुरु झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक, समीक्षक डॉ. आशा मंडपे यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, माजी मुख्याध्यापक श्री. अ. सी. चिटणीस, श्री. अ. वि. सहस्रबुद्धे, पर्यवेक्षक श्री. प्र. बा. कुलकर्णी, माजी शिक्षक श्री. प्र. ग. वैद्य उपस्थित होते.

या प्रदर्शनासाठी कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर, श्री. विलास कोळी, श्री. वासुदेव वैद्य यांनी खूपच मेहनत घेतलेली दिसली. त्यांना इ. ९ वी च्या विद्यार्थीनींचे सहकार्य मिळाले.

या प्रदर्शनाबाबत डॉ. वा. ना. बेडेकरांनी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले. डॉ. आशा मंडपे यांनी मुलांची कल्पनाशक्ती व निर्मितीची ओढ या सुंदर प्रदर्शनात दिसली. या चित्रांतील रेखीवपणा, रंगसंगती, नीटनेटकेपणा आवडला. त्याबद्दल विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन अशा शब्दात अभिप्राय दिला. इतर मान्यवर उपस्थितांनीही विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक केले.

या शाळेतील कलाशिक्षिका म्हणाल्या की, आमच्या आणि विद्यार्थ्यांच्या सुदैवाने आमच्या शाळेत कलाविषय इ. १० पर्यंत सक्तीचा आहे. या विषयात प्रयोग करताना आमच्या मुख्याध्यापिका व इतर वरिष्ठ यांचे नेहमीच प्रोत्साहन मिळते. त्यामुळेच काम करताना उत्साह वाटतो !

या प्रदर्शनात सद्य स्थितीवर आधारित स्मरणचित्रे आहेतच, त्याशिवाय विविध विषयांवरील चित्रे, चिकटचित्रे (कोलाज) पोस्टर्स व कागदाची शिल्पे, छायाचित्रे यांचाही समावेश आहे. हे प्रदर्शन १६ फेब्रु. २००२ पर्यंत सर्वांसाठी सकाळी ८ ते संध्या. ४ पर्यंत खुले होते.

### कु. माधुरी वावडेकरचे सुयश

ऑल इंडिया कॅमल कलर कॉन्टेस्टमधे डॉ. बेडेकर विद्या मंदिर मधील कु. माधुरी वावडेकर हिला राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. तिला सौ. मंजिरी दांडेकर यांनी मार्गदर्शन केले.

यापूर्वीही या शाळेतील विद्यार्थ्यांनी आंतरशालेय स्पर्धांमधे राज्यस्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर, पारितोषिके प्राप्त केली आहेत.

### डॉ. बेडेकर विद्यामंदिराच्या प्राथमिक विभागाने आयोजित केलेली अभूतपूर्व बालगोपाळ मंडई

बुधवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी त्यांनी शाळेच्या प्रांगणात 'बालगोपाळ भाजी मंडई' या शीर्षकाचा आगळा वेगळाच कार्यक्रम आयोजित केला होता.

नोकरी करणारे मुलांचे आई-वडिल ऑफीससंपून सायंकाळी परत येतानाच भाजी, फळे इ. गोष्टी विकत घेतात व घरी परततात. त्यामुळे त्यांच्या मुलांना भाज्या, भाज्यांचे प्रकार, त्यांचे भाव, वजनकाटा (तराजू) इ. गोष्टींची काहीच माहिती नसते. तशी माहिती मुलांना व्हावी, भाजी बाजारातील व्यवहार कळावेत., विविध प्रकारच्या भाज्यांची मुलांना माहिती व्हावी म्हणून या भाजीबाजाराचे शाळेने आयोजन केले होते.



भाजी खरेदी करताना माननीय डॉ. वा. ना. बेडेकर

शाळेच्या प्रांगणात भाजी बाजाराचे दृश्य दिसत होते, अनेक भाजी विक्रेते आपापली छोटी-छोटी दुकाने थाटून 'भाजी घ्या भाजी, ताजी भाजी' अशा अनेक प्रकारच्या घोषणा देत होते. हे भाजी विक्रेते म्हणजे पूर्व प्राथमिक शाळेतील छोट्या-छोट्या मुली व मुले होती. त्या छोट्या मुली भाजी विकणाऱ्या बाईप्रमाणे नऊवारी साड्या नेसल्या होत्या, त्यांच्या गळ्यात मंगळसूत्र व हातात बांगड्या होत्या, त्यांनी कपालाला कुंकवाचा मोठा टिळा लावला होता व आवश्यक ते सर्व प्रकारचे मेकअप केले होते त्यामुळे त्या भाजीवाल्याच आहेत असे वाटत होते. त्या नाजुक मुलींना पाहणे हे भाजी खरेदी करण्यास आलेल्या पालकांचे कुतुहल होते. मुलांनी धोतर किंवा लेंगा आणि पांढरा सदरा, टोपी असा पेहराव केला होता. कपाळाला त्यांनी बुक्का लावला होता.

पालक, शेपू, मुळा, मेथी इ. पालेभाज्या, कोबी, वांगी, टॉमेटो, गाजर, मुळा, सिमला मिरची, कांदे-बटाटे इ. फळभाज्या, मिरची, कोथिंबीर, आले, लिंबू, कढीपत्ता, मटार, कारली, तोंडली, फरसबी, घेवड्याच्या शेंगा, शेवग्याच्या शेंगा इत्यादी अन्य अनेक भाज्या, मोड आलेली धान्ये, द्राक्षे, चिकू, सफरचंद, डाळिंब इ. अनेक प्रकारची फळे बालगोपाळ मंडईत विक्रीसाठी उपलब्ध होती. त्या खेरीज उदबत्त्या, धूप, फराळाचे पदार्थ यांची ही छोटी-छोटी दुकाने (स्टॉल) थाटलेली होती.

डॉ. वा. ना. बेडेकरांच्या हस्ते या बालगोपाळ मंडईचे उद्घाटन झाले. तो बाजार, ती छोटी मुले, शिक्षिकांचे मार्गदर्शन पाहून डॉ. बेडेकर भारावून गेले. त्यांनी त्या सर्वांचे मुक्तकंठाने कौतुक केले व स्वत: भरपूर भाजीही विकत घेतली. पालकांची भाजी खरेदीसाठी व मुलांचे कौतुक करण्यासाठी झुंबड उडाली होती. सर्वांना तो बाजार, ती बाजाराची कल्पना आवडली. मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य, सर्व सहकारी शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले. हा भाजीबाजार त्या छोट्या मुलांना एक वेगळाच आनंद, वेगळाच अनुभव देऊन गेला.

**अभिनंदन ! अभिनंदन !! अभिनंदन !!!**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनासाठी अजून एक मानाचा तुरा.

भारती विद्यापीठ (वी. व्ही. आय. टी), सी.बी.डी. नवी मुंबई यांनी आयोजित केलेली आंतर-तंत्रनिकेतन प्रोजेक्ट स्पर्धा 'VENTURA - 2002' ७ फेब्रुवारी २००२ रोजी पार पडली. ह्या स्पर्धेसाठी विविध तंत्रनिकेतनाचे सुमारे ५० प्रोजेक्टस् आलेले होते. इलेक्ट्रिकल विभागाचे प्रथम पारितोषिक आपल्या तंत्रनिकेतनातील तृतीय वर्षाच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिमच्या विद्यार्थ्यांना मिळालेले आहे. ह्या विजेत्या प्रोजेक्टचे नाव. **"Jib crane with electro magnetic Hook"** असे आहे. ह्या प्रोजेक्टमध्ये खालील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

| | |
|---|---|
| १) शैलेंद्र मोहिते | २) सचिन काटे |
| ३) अमित कोपरलेकर | ४) अविनाश टाकळकर |
| ५) कु. शोभा नागर | ६) कु. दिप्ती नागवेकर |




**1st Prize in "Ventura - 2002" exhibition cum competition held on 7th Feb 2002.**
**"Jib crane with electro magnetic Hook"**

कुठलीही गोष्ट योग्य मार्गदर्शनाशिवाय यशस्वी होत नसते. तसेच ह्या प्रोजेक्टसाठी सौ. स्मिता आचार्य (अधिव्याख्याता) व सौ. निशा वेद्रर (विभागप्रमुख) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे विद्यार्थीनी सांगितले. प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांनी 'हे पारितोषिक तंत्रनिकेतनासाठी अभिमानास्पद आहे' असे उद्गार काढले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ. वा. ना. बेडेकर व उपाध्यक्ष श्री. एस. व्ही. करंदीकर यांनी ही विद्यार्थ्यांचा गौरव केला.

हे प्रोजेक्ट इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिमच्या विभागात बघण्यासाठी ठेवले आहे.

**बांदोडकर महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी-सागर चौधरी याची लेफ्टनंट पदावर नियुक्ती**

मार्च १९९७ मध्ये ठाण्याच्या बांदोडकर महाविद्यालयातून बारावीत उत्तीर्ण झालेल्या व त्यानंतर माटुंग्याच्या रामनारायण रुईया कॉलेजच्या बी. एस. सी.

उत्तीर्ण झालेल्या व मूळचा ठाणे शहरातील रहिवासी असलेल्या श्री. सागर प्रकाश चौधरी २१ वर्षांच्या तरुणाची भारतीय सेना दलाच्या आर्टिलरी रेजिमेंटमध्ये लेफ्टनंट पदावर निवड झाली.



लेफ्टनंट सागर प्रकाश चौधरी

या यशामध्ये त्याला चेंबूर येथील कॅप्टन बंजारी अकॅडमीचे संचालक सुरेश बंजारी यांचे मार्गदर्शन लाभले. श्री. सागर चौधरी त्या पदावर दिनांक २८ डिसेंबर २००१ रोज रुजू झाला आहे. त्याचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी हार्दिक अभिनंदन केले.

**पदार्थ विज्ञान नवीन अभ्यासक्रम कार्यशाळा -**

'पदार्थ विज्ञानात पदव्युत्तर पदवीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र म्हणून बांदोडकर विज्ञान महाविद्यालय मध्यवर्ती व आदर्श आहे' असे उद्गार विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचे डिन डॉ. जयंत दिघे यांनी अलीकडेच ठाणे महाविद्यालयाच्या पदार्थ विज्ञान विभागाने मुंबई विद्यापीठाच्या साहाय्याने प्रथम वर्ष पदवी परीक्षेच्या जून २००२ पासून येणाऱ्या नवीन अभ्यासक्रमावर आयोजित केलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन करताना काढले. मुंबई विद्यापीठ क्षेत्रातील पदार्थ विज्ञान शिकविणारे शंभर हून अधिक प्राध्यापक कार्यशाळेत उपस्थित होते. विद्यार्थ्यांना विषयांत रस वाटेल व आपला विषय विद्यार्थी प्रिय ठरेल अशा कल्पनेने विषयाचे अध्यापन करण्याची आवश्यकता आहे असेही त्यांनी सांगितले.



डॉ. दिघे यांचे स्वागत करताना प्राचार्य सी. जी. पाटील

उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक व स्वागत पर भाषण सदर कार्यशाळेचे निमंत्रक व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी केले. दीप प्रज्वलनाने समारंभास सुरुवात झाली. कार्यशाळेचे संयोजक व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील जेष्ठ प्रा. डॉ. मनोहर न्यायते यांनी कार्यशाळेची आवश्यकता स्पष्ट केली. प्रा. एस. वेंकटरामन यांनी डॉ. दीघे यांचा परिचय करून दिला तर प्रा. सौ. इनामदार यांनी सूत्र संचलन केले. उद्घाटन समारंभास मुंबई विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान अभ्यास मंडळाचे डॉ. सहस्त्रबुद्धे गोगटे महाविद्यालय, रत्नागिरी, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, ज्ञानसाधना महाविद्यालयाचे उपप्राचार्य व पदार्थ विज्ञान प्रमुख डॉ. देवधर व काही निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनानंतर झालेल्या एका सत्रात अभ्यासक्रमातील विषयांच्या प्रभावी अध्यापनाच्या दृष्टीने चर्चा झाली तर दुसऱ्या सत्रात प्रयोगांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यात संगणकाचा प्रात्यक्षिकांतील उपायोग यावर अधिक भर देण्यात आला होता. समारोपाच्यासत्रा साठी मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास समितीचे संचालक डॉ. सुधीर पानसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी

डॉ. मनोहर न्यायते पदार्थविज्ञान विभाग प्रमुख प्रा. व्ही. डी. गोलतकर, विभागातील इतर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष कष्ट घेतले. त्यांना प्राचार्य सी.जी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले होते.

**भारतीय कला ही येथील संस्कृतीचे प्रतीक - डॉ. जी. बी. देवगलूरकर**

विद्याप्रसारक मंडळातर्फे आयोजित भावे राष्ट्रीय व्याख्यानमालेत बोलताना पुण्याचे पुरतत्त्वशास्त्राचे अभ्यासक जी. बी. देगलूरकर यांनी आपल्या व्याख्यानातून उपस्थित श्रोत्यांना देवदेवतांच्या मूर्त्यांकडे केवळ आंधाळ्या भक्तिभावाने न पहाता उघड्या व चिकित्सक दृष्टीने पाहिले असता त्याचे वेगळेपण अधिक आकर्षक कसे दिसते हे पटवून दिले. तसेच भारतीय कला ही येथील संस्कृतीचे प्रतीक असल्याचे त्यांनी व्याख्यानात सांगितले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आपली परंपरा टिकवून ठेवणारी भावे व्याख्यानमाला श्रोत्यांना नवे काही शिकवून गेली. विविध क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींद्वारा उपस्थित श्रोत्यांनी या व्याख्यानमालेत संवाद साधला जातो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर यांनी केले. डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या मनोगतात या व्याख्यानाने श्रोत्यांना मूर्तीकलेकडे पाहण्याची एक नवी दृष्टी लाभेल असे सांगून पुढची सूत्रे व्याख्यात्यांकडे दिली.

पुरातत्त्वशास्त्र या विषयात पी. एच. डी तसेच डी. लीट केलेल्या जी. बी. देगलूरकरांच्या नावावर किमान आठ इंग्रजी आणि मराठी पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. आणि मूर्तीशास्त्र हा त्यांचा आवडता विषय आहे. आपल्या व्याख्यानात त्यांनी पुराण मूर्ती, स्थापत्यकला पहात असताना केवळ देवदेवतांच्या मूर्ती म्हणून भावूकपणे न पहाता त्यामागची पारश्वभूमी लक्षात घेऊन पाहिल्यास आपणास त्या कलेतील बारकावे, मूर्तीकाराची कला, त्या कलेतून त्यावेळचे एकंदर दृश्य उभे करण्याची त्यांची हातोटी ह्या गोष्टी लक्षात येऊ शकतील, असे ते म्हणाले. ते पटवून देताना त्यांनी अजिंठा वेरुळ लेण्यातील, एलिफंटातील स्थापत्याची, मूर्ती कलेची अनेक उदाहरणे त्या त्या गोष्टी सांगून दिली. मूर्तीकार स्थापत्यातून केवळ मानवी भावभावनांचे रेखाटन न करता प्राण्यांच्या भावनाही कशा तरलतेने टिपतो हेही त्यांनी उदाहरणातून श्रोत्यांना पटवून दिले. एकंदर परिस्थिती प्रसंग डोळ्यासमोर ठेवूनच तोही कलाकृतींचा निखळ आनंद आपल्याला मिळू शकेल असे त्यांनी स्पष्ट केले.

'कलेला व्याख्येत बांधणे सोपे नाही' असे सांगताना ते म्हणाले की, We dream means we imagine म्हणजे ती image आपल्यासमोर उभी राहते ती कला. कैलास लेण्यातील 'मृत्यूचे शिल्प' यातही एक सौंदर्य कसे आहे याचे विश्लेषण यांनी केले. 'सुंदर मी होणार, नव्या तनुचे नव्या शक्तीचे पंख मला फुटणार' याचे चित्र यात साकारलेले आहे हे त्यांनी पटवून दिले.

पूर्वीच्या आजच्या बदलत्या कलेबद्दल सांगताना ते म्हणाले की, 'पूर्वीच्या कलाकारांना मॉडेलस समोर न ठेवता हुबेहुब शिल्प निर्माण करता येत होते पण आज तसे नाही. पूर्वी रंग कसे तयार केले जात याचेही अनेक दाखले त्यांनी दिले. अंजलो, पिकासो मायकेल या जगप्रसिद्ध कलाकारांची उदाहरणे त्यांनी दिली. आपली कला ही भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे तर पाश्चात्यांची कलाही त्यांच्या श्रीमंतीचे, तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे' असे प्रतिपादन त्यांनी केले. हे स्पष्ट करत असताना त्यांनी मोहेंजोदाडोतील कलाकृतीचे उदाहरण दिले. अशा तऱ्हेने कलेच्या वेगवेगळ्या अंगाना स्पर्शणारे त्यांचे वक्तत्व श्रोत्यांच्याही मनाला तसेच बुद्धीलाही स्पर्शून एक नवी दृष्टी देणारे ठरले यात शंकाच नाही. प्रा. मोहन पाठक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

**वार्तालेखन - प्र. ग. वैद्य, माधवी राणे व प्रा. मोहन पाठक**

•••

# On Lord

*Give me the strength*
*Lightly to bear my joys & sorrows.*
*Give me the strength*
*To make my life fruitful in service.*
*Give me the strength*
*Never to Disown the Poor Or*
*Bend my knees before Insolent might.*
*Give me the strength*
*To Do away with Trifles of Life.*
*Give me the strength*
*To Surrender my Strength to*
*Thy will with Love.*

**Gurudev Tagore**